| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २३० वा | मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## एसटीची 'हेल्पलाईन'

### धाराशिव शालेय विद्यार्थी - विद्यार्थीनींसाठी सोय

धाराशिव (प्रतिनिधी)- शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींना घरातून शाळेला जाताना अथवा शाळेतून घरी येताना एसटी प्रवासात काही अडचण आल्यास अथवा एसटी बसेस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द करण्यात आल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी यासाठी लवकरच एसटी महामंडळाची 'हेल्पलाइन' सुरू करण्यात येत आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली.

ते धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिल्यानंतर तेथील उपस्थित विद्यार्थी -विद्यार्थ्यांची संवाद साधताना बोलत होते.

राज्यभरातील लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना एसटी महामंडळ शाळेत जाण्यासाठी व तेथून घरी येण्यासाठी बस फेऱ्या पूरवित असते. राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून मानव विकास निधी अंतर्गत राजाच्या दुर्गम व आदिवासीबहुल भागामध्ये शालेय विद्यार्थिनींना प्रवासी सेवा देण्यासाठी 'मानव विकास बसेस' उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्या बसेस विशेषत: शालेय विद्यार्थिनींची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात याव्यात. अशा सक्त सूचना देण्यात आलेले असतात. परंतु अनेक आगारात या नियमाची पायमल्ली केलेली दिसून येते. धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली असता, तेथे उपस्थित असणाऱ्या शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींनी याबाबत अनेक समस्या व तक्रारी मंत्री महोदयांसमोर मांडल्या. अनेक शालेय बसेस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बसेस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार त्यातील काही विद्यार्थ्यांनी केल्या. तसेच संध्याकाळच्या वेळी शाळा -महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले आपल्या घरी जाणे अपेक्षित असते. तथापि, बसेस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास खूप उशीर होतो. त्यामुळे त्यांना त्यांच्या पालकाचे ओरडे खावे लागतात. अनेक ठिकाणी तर गैरसमजातून पालकांनी विद्यार्थ्यांना उशिरा येण्याबद्दल शिक्षाही दिलेल्या आहेत. याचा विपरीत परिणाम म्हणून काय विद्यार्थिनींनी आत्महत्या केल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत.

याबाबत एसटीच्या स्थानिक प्रशासनाने अतिशय गांभीर्याने या गोष्टी घेणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.



### लवकरच विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी एसटीची हेल्पलाईन सुरू होणार

शालेय विद्यार्थी -विद्यार्थिनींना आपल्या घरातून शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बसेस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे ,तांत्रिक बिघाडामुळे बस नादूरूस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी तातडीने एसटीच्या हेल्पलाइन क्रमांक वर संपर्क करून मदत घ्यावी या हेतूने लवकरच एक हेल्पलाइन क्रमांक प्रदर्शित करण्यात येईल , तसेच ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक संबंधित शाळा, महाविद्यालयांना देण्यात येतील जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच थेट विद्यार्थी- विद्यार्थ्यांनी देखील या विभाग नियंत्रकांना संपर्क करून आपल्या समस्या मांडू शकतात. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री.प्रताप सरनाईक यांनी दिली.

## क्राईम न्युज

### दरोड्याचे तयारीत असणारे आनंदनगर पोलीसांच्या ताब्यात

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत हिरसिंग रा. फुलेनगर परळी ता. परळी जि. बीड, आकाश वय २६ वर्षे, रा. खोब्रागडे गल्ली नं ०१ साठे चङौक नांदेड ता. जि. नांदेड, सतनामसिंग , रा. नवा मोंढा वसमत ता. वसमत जि. हिंगोली व इतर दोन इसम यांनी दि. २२.११.२०२५ रोजी एमआयडीसी भागात तुळजाई नगर रोडच्या बाजूस धाराशिव येथे दरोड टाकण्याच्या उद्देशाने दरोड्याच्या साहित्यासह लपुन बसलेले मिळून आले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-गोविंद गुरनाथ पतंगे पोलीस हावलदार नेमणुक पोलीस ठाणे आनंदनगर यांनी दि.२२.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१०(४)(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### २५० लिटर डिझेल असे एकुण ३,५९,७५० किंमतीचा मालाची अज्ञाताने केली चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१८.११.२०२५ रोजी कडकनाथवाडी शिवारातील टाटा पावर लोकेशन केटी १५ येथील ट्रेलर क्र एचआर ५५ एक्स ४२४१ दहा चाक डिस्कसह प्रति टायर डिस्कसह ट्रेलर क्र एचआर ५५ एक्स ४२४१ केबीन मधील डॅश बोर्ड इलेक्ट्रीकल पॅनलची तोडफोड करुन ट्रक व ट्रेलर मधील २५० लिटर डिझेल असे एकुण ३,५९,७५० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-फैज अनवर फैजी, वय २९ वर्षे, रा. न्यु शितल नगर जालंदर ता. न्यु दाणामंडी जि. जालंदर राज्य पंजाब ह.मु. वाशी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.२२.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२),३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### निष्काळजीपने अग्नी प्रज्वलीत करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सार्वजनिक रस्त्याकडेला हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत कणाऱ्यांवर बेंबळी पोलीसांनी दि. २१ नोव्हेंबर रोजी कारवाई केली. विठ्ठलवाडी ता. जि. धाराशिव येथील ग्रामस्थ- सुरज यांनी केशेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रोडवर आपल्या हातगाड्यावरील शेगडीवर निष्काळजीपने अग्नि प्रज्वलीत करुन पदार्थ तयार करत असताना बेंबळी पोलीसांना मिळून आले.यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरध्द भा.न्या.सं. कलम- २८७ अन्वये बेंबळी पो.ठा. येथे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## नवीन सर्व्हिस रोड धोकादायक अपूर्ण कामामुळे नागरिक त्रस्त

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हिस रोडचे काम मार्गी लागले असले तरी अद्याप अनेक ठिकाणी गंभीर त्रुटी कायम आहेत. या त्रुटी दुर्लक्षित करून रस्ता पूर्ण झाल्याचे दाखवण्याचा प्रयत्न होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरातील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण लक्ष देत नसल्याने नागरिकांत तीव्र नाराजी आहे.

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्गावरील सर्व्हिस रोडचे काम २०२४ च्या पावसाळ्यात सुरू झाले होते. दीड वर्ष उलटूनही रस्त्याचे काम अपूर्ण असून अनेक ठिकाणी धोकादायक दोष कायम आहेत. सांजा चौक ते वरुडा चौक या दरम्यानच्या मार्गावर सर्वाधिक त्रुटी दिसून येत आहेत. टापरे बिल्डिंग ते सांजा चौक दरम्यान अनेक भागांमध्ये डांबरीकरणाचे अंतीम थर टाकलेले नाहीत. काही ठिकाणी अर्धवट डांबरीकरण आहे.

शिवनेरी नगरकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांवरील नाल्यांचे स्लॅब तुटलेले असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तर श्री साई हटिलसमोर नालीचे काम पूर्ण केलेले नाही. त्यामुळे पावसाळ्यात तुडूंब वाहणाऱ्या नाल्यांचे पाणी पुन्हा रस्त्यावर येणार आहे.साई कमल हॉटेलसमोर सुरक्षाजाळी लावलेली नसणे आणि अंतिम डांबरी थर न टाकल्यामुळे अपघातांचा धोका प्रचंड वाढला आहे. पुढे सांजा चौकाच्या दिशेने पुलाजवळ जिथे सर्व्हिस रोड मुख्य रस्त्याला मिळतो, त्या ठिकाणीही डांबरीकरण बाकी आहे. त्यामुळे दुचाकीस्वार सतत किरकोळ अपघातांना सामोरे जात आहेत. अनेकांना किरकोळ जखमी व्हावे लागत आहे. येथून शालेय विद्यार्थी वाहतुकीची वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. त्यामुळे सतत वर्दळ असते. याचा धोका भविष्यात गंभीर असणार आहे.

## माजी सरपंच कै. बंकटराव( बापू) कदम यांच्या नावे बापू चौक फलकाचे अनावरण



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील आपल्या ५० वर्षाच्या राजकीय कार्यकाळात जळकोट गावच्या विकासात भरीव योगदान दिलेले माजी सरपंच, तुळजाभवानी व कुलस्वामिनी सहकारी संस्थेचे संस्थापक संचालक , पार्वती कन्या प्रशालेचे संस्थापक कै. बंकटराव(बापू) कदम यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त जळकोट गावानजिकच्या मुंबई - हैदराबाद महामार्गावरील हंगरगा (नळ ) मोडला कै. बंकटराव(बापू)विठोबा कदम बापू चौक - नगर असे नामकरण करण्यात आले आहे. या फलकाचे अनावरण वारकरी संप्रदायातील शंकर( काका) वाडीकर यांच्या हस्ते करण्यात आले. माजी सरपंच कै. बंकटराव(बापू) कदम यांच्या कार्यकाळात जळकोट गावचा झालेला विकास हा न विसरता येण्यासारखा आहे. गावातील तरुणांनी पुढाकार घेऊन त्यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याला उजाळा मिळावा. यासाठी हंगरगा मोडचे नामकरण करण्यात आले आहे. या नव्या नगराच्या माध्यमातून भावी पिढीला प्रेरणा मिळणार आहे. अशा वेगळ्या पद्धतीने कै. बंकटराव (बापू) कदम यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी प्रभाकर( काका) कदम, रणजीत पाटील, नागराज(दाजी) जाधव, प्रकाश सावंत, निवृत्ती कदम, राहुल पाटील,गणेश कदम,सुदीप चौधरी, बालाजी पालमपल्ले, सचिन माळगे, प्रशांत बिराजदार, अजिंक्य माने, अभिजीत कवठे, वैभव स्वामी, नितीन मोरे, हनुमंत जाधव, विशाल(अप्पा) कदम, प्रथमेश पालमपल्ले, आशुतोष चुंगे, सिद्धेश्वर सुरवसे, विजय धरणे, ओंकार कोळी आदि युवक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## माजी नगरसेवकांसह कार्यकर्त्यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश. - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

धाराशिव (प्रतिनिधी)- शहरातील भाजपचे नेते माजी नगरसेवक तथा माजी शहराध्यक्ष संभाजी सलगर यांच्यासह कार्यकर्त्यांनी शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश केला. खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, सहसंपर्क प्रमुख मकरंद राजेनिंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा प्रवेश सोहळा पार पडला.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांची विचारसरणी आणि उद्धवसाहेबांचे संवेदनशील नेतृत्व मान्य करत भाजपच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या भगव्या झेंड्याखाली एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

यावेळी श्री. सलगर म्हणाले, मी २०-२५ वर्षांपासून राणा पाटील यांच्या बरोबर काम करत आलो. मी कोणत्याही अपेक्षा न ठेवता त्यांच्यावर निष्ठा ठेवली. नगराध्यक्ष पदाची संधी दिली नाही पण किमान वार्डात तरी मला संधी मिळेल एवढी अपेक्षा मला होती. पण त्यांनी ती सुद्धा दिलेली नसल्याने माझ्या कार्यकर्त्यांनी हा निर्णय घेतल्याच सलगर म्हणाले. खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार कैलास पाटील यांचे हात बळकट करणार असून आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संगीता सोमनाथ गुरव यांना निवडून आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

जिल्हाप्रमुख कैलास पाटील यांनी संभाजी सलगर यांना पक्षात सन्मानाचे स्थान मिळेल असा विश्वास दिला. त्यांच्या राजकीय अनुभवाचा निश्चित आम्हाला फायदा होणार असल्याच आमदार पाटील म्हणाले. सलगर यांच्या सोबत अजय नाईकवाडी, अविनाश शाबादे, महेश शिंदे, श्री. महाडिक, राहुल सलगर, देशमाने नंदकुमार, काकाजी अंकुश, राजेंद्र शिंदे, रामचंद्र कसबे, महेश नरवडे, विवेक मुळे, ऋषिकेश कपाळे, पोपट कासार, आर्यन सलगर, गौरव सलगर, भोलेनाथ मधुरकर, नागेश मधुरकर, नवनाथ शेरकर, लखन शेरकर यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला..

यावेळी प्रवीण कोकाटे, सोमनाथ गुरव, संग्राम देशमुख, बाळासाहेब काकडे, रवी वाघमारे, तानाजी जाधवर, पंकज पाटील, अभिजित देशमुख, हनुमंत देवकते, सिद्धेश्वर कोळी, गणेश खोचरे, राज निकम, परवेज काझी, मनोज पडवळ, महेश लिमये, पंकज स्वामी, गफूर शेख आदी उपस्थित होते.

## जळकोट येथील महिलेच्या खुन प्रकरणाची स्थानिक गुन्हे शाखेने लावला छडा..



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे दि २१.११.२०२५ रोजी पोस्टे नळदुर्ग हददीत जळकोट येथे महिला सुभद्रा रामशेटटी पाटील, वय ६० वर्षे, रा जळकोट या वृदध महिलेचा तिच्या राहत्या घरी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने खुन करून अंगावरील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली होती. सदरबाबत पोस्टे. नळदुर्ग गुरनं. ४३०/२०२५ कलम १०३(१), ३११ (८), ३०५ भा.न्या.सं. अन्वये खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. या बाबत समजलेली माहिती अशी की, प्रथमदर्शनी सदर गुन्हा कोणी केला याबाबत पुरावे उपलब्ध नसल्याने सदरील गुन्हा उघडकीस आणणे पोलीसांसमोरील मुख्य आव्हान होते.

गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलीस अधिक्षक श्रीमती रितू खोखर यांनी तातडीने स्थानिक गुन्हे शाखा धाराशिव यांना तात्काळ सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते. त्या अनुशंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार व पथक यांनी तात्काळ सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून गुन्हा उघडकीस आणण्याच्या दुष्टीकोनातुन पुरावे गोळा करण्यास सुरूवात केली. तसेच गुन्हयाचे अनुशंगाने गोपनीय माहिती मिळवण्यास सुरूवात केली. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि तांत्रिक माहितीच्या आधारे एक महिला संशयितरीत्या घटनास्थळाचे आजूबाजूला फिरत असल्याचे दिसून आली. सदरील महीला कोण आहे याबाबत अधिक माहिती घेतली असता सदर महिला याच परीसरात राहणारी वनिता ही असल्याचे समजले. त्यावरून नमुद महिलेच्या मुलाकडे तिच्याबाबत चौकशी केली असता ती उपचारकामी ससुन रूग्णालय, पुणे येथे गेली असल्याचे त्याने सांगितले. त्यावरून एक पथक नमुद महिलेचा शोध घेणेकामी पुणे येथे पाठविण्यात आले त्यादरम्यान ती भिगवण येथे राहत असलेल्या तिच्या मुलीकडे असल्याबाबत माहिती मिळाली. त्या ठिकाणावरून तिस ताब्यात घेण्यात आले. तिच्याकडे नमुद गुन्हयाचे अनुशंगाने चौकशी केली असता तीने उडवाउडवीची उत्तरे दिली. तिस विश्वाासात घेवून विचारले असता तिनेच सदरील गुन्हा केला असल्याची कबुली दिली. सदर महिलेस खुन करण्यामागचा उददेश विचारला असता तिने सांगितले की, मयत महिलेकडून दागिने गहाण ठेवून ४०,००० रू उसणे घेतले होते आणि त्या मुददयावरून मयत महिला हि सतत त्रास देत होती. त्या गोष्टीचा राग मनात धरून सुभद्रा हिचा २१.११.२०२५ रोजीच्या मध्यरात्री खुन केला आणि तिच्या अंगावरील दागिने काढून पुणे येथे पळून गेली होती. सदरील महिला नामे वनिता रा जळकोट ता तुळजापूर जि धाराशिव हिस पुढील तपासकामी पोलीस ठाणे नळदुर्ग यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, पोह शौकत पठाण, पोह जावेद काझी, पोह फरहान पठाण, पोह प्रकाश औताडे, चापोह सुभाष चौरे, रत्नदिप डोंगरे, नागनाथ गुरव यांचे पथकाने केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## कळंब बस स्थानकाची स्वच्छता समितीकडून तपासणी



कळंब (प्रतिनिधी)-येथील बस स्थानकाची स्वच्छतेबाबतची उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्रमांक १ यांच्या समिती मार्फत दि . २४ नोहेंबर रोजी तपासणी करण्यात आली .

हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छता मोहिमे २०२५ अंतर्गत कळंब बस स्थानकाची स्वच्छतेबाबतची तपासणी मोहीम राबविण्यात आली .

या तपासणी समितीमध्ये उप महाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्रमांक १ यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करण्यात आली या तपासणीमध्ये विविध विभागांना भेटी देण्यात आल्या व बस स्थानक स्वच्छता ,प्रवाशांना पिण्याचे पाण्याचा व्यवस्था ,त्याचबरोबर गाड्यांची पार्किंग ,सुलभ शौचालय, बस स्थानकाची रंगरंगोटी आदी बाबी तपासण्यात आल्या . या नियंत्रण समितीमध्ये मुंबई विभागाचे उपमहाव्यवस्थापक श्रीमती चेतना खिरवाडकर , प्रादेशिक अभियंता विवेक लोंढे , प्रवासी मित्र संघटनेचे प्रा . मोहन जाधव , कळंब तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास मुळीक यांनी या समितीमध्ये काम पाहिले . यावेळी समितीने सर्व परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले . यावेळी त्यांचा प्रभारी आगार प्रमुख बालाजी भारती यांनीसमिती प्रमुखांचे स्वागत केले . तर समितीने कर्मचाऱ्याचे यांचे कौतुक केले या स्वच्छता मोहीम तपासणीसाठी प्रभारी आगार प्रमुख बालाजी भारती , वाहतूक निरीक्षक निलेश जाधव , विलास जाधव, वाहतूक नियंत्रक सुशिल हुंबे, चेतन गोसावी, एस . व्ही. सारुक , प्रभाकर झांबरे व कार्यालयीन कर्मचारी, यांत्रिक कर्मचारी यांच्या सह आदी नी परिश्रम घेतले .

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## भारतीयांनी, काही आठवणी ठेवाव्यात

सिंध हा एकेकाळी भारताचा भाग होता. भारताचा फळणीपुर्व नकाशा डोळ्यासमोर ठेवला तर भारताची सीमा व भूप्रदेश किती होता हे कळून येते. सिंधच काय पाकव्याप्त काश्मीरचा भुभाग भारताचा आहे व होता. त्यामुळे तो स्वखुशीने भारतात विलीन झाला पाहिजे. या बाबत भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नुकतेच एका कार्यक्रमात केलेले एक वक्तव्य चर्चेचा विषय दिसून येत आहे. सीमा कधी बदलेल हे कोणी सांगू शकत नाही आणि उद्या सिंध भारताला पुन्हा परत मिळू शकतो, असे राजनाथ सिंह म्हणाले आहे. दरम्यान या विधानावर पाकिस्तानच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून प्रतिक्रिया देण्यात आली आहे. त्यांनी राजनाथ सिंह यांच्या सिंध प्रांतावरील विधानाचा तीव्र निषेध केला आहे. सिंध प्रांतातील जनतेवर मोठा अन्याय होत आहे. पाकिस्तानी धर्मान्धांचा अतोनात अन्याय, अत्त्याचार चालू आहे. ही बाब लक्षात घेता राजनाथसिंह यांचे वक्तव्य चुकीचे नाही. पाकिस्तानने सिंह यांचे विधान हे 'भ्रामक आणि धोकादायक पद्धतीने बदल करण्याच्या बाजूचे असल्याचे म्हटले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, अशी विधाने ही प्रस्थापित झालेल्या वास्तविकतेला आव्हान देऊ पाहणारी हिंदुत्वाची मानसिकता उघड करतात आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचे, मान्यता मिळालेल्या सीमा आणि देशाच्या सार्वभौमत्वाचे स्पष्टपणे उल्लंघन करणारी आहेत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह रविवारी बोलताना आज सिंध भारताचा भाग नसला तरी, भविष्यात सीमा बदलू शकतात आणि हा भाग एके दिवशी भारताकडे परत येऊ शकतो. सिंधी समुदायाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात बोलताना, त्यांनी लालकृष्ण अडवाणी यांच्या पुस्तकातील उल्लेख केला आणि सांगितले की, अडवाणी यांच्या पिढीतील अनेक सिंधी हिंदूंना सिंध भारतापासून वेगळा झाला हे आजही स्वीकारणे कठीण जाते. पाकिस्तानची निर्मिती १९४७ च्या फाळणीदरम्यान झाली, आणि सिंधू नदीच्या बाजूचा सिंध प्रदेश तेव्हापासून पाकिस्तानचा भाग म्हणून ओळखला जावू लागला. तो सिंधी व्यक्तीच्या मानसिकेविरोधात आहे. ना. राजनाथसिंह यांच्यावक्तव्याकडे दुर्लक्ष करून चालणार त्यांनी या ठिकाणी लालकृष्ण अडवाणी यांचा देखील उल्लेख करून त्यांनी त्यांच्या एका पुस्तकात लिहिले आहे की सिंधी हिंदूंनी विशेषतः त्यांच्या पिढीतील लोकांनी आजही सिंध प्रांत भारतापासून वेगळा होणे स्वीकारलेले नाही. केवळ सिंधमध्येच नाही तर संपूर्ण भारतात हिंदू सिंधू नदीला पवित्र मानतात आणि सिंधमधील काही मुस्लिम देखील सिंधू नदीला पवित्र मानत होते. असेही म्हटले जायचे की सिंधूचे पाणी मक्केच्या आब-ए-जमजमपेक्षाही कमी पवित्र नाही. हे अडवाणींचे वाक्य आहे, असे राजनाथ सिंह यांनी म्हटले. पुढे ते म्हणाले की, सिंधची भूमी भारताचा भाग भलेही नसेल. पण सभ्यतेच्या दृष्टीने सिंध नेहमीच भारताचा भाग राहील. आता राहिली गोष्ट जमिनीची, तर सीमा कधी बदलेल हे कोणीही सांगू शकत नाही. कारण उद्या सिंध भारताला पुन्हा परत मिळू शकते. सिंधू नदीला पवित्र मानणारे आपले सिंधचे लोक नेहमीच आपले असतील, मग ते कुठेही असले तरी, असे राजनाथ सिंह यांनी म्हटले. या वक्तव्यावरून पाकिस्तानचे डोके भडकणार आहे. वास्तविक भारताकडून स्वातंत्र्यावेळी जर फाळणी रोखता आली असती तर सिंध हा भारताच राहीला असता. अतिषय घाई व गडबडीत घेतलेला निर्यय सत्तर-पंच्याहत्तर वर्षे झाली तरी कायम डोकेदुखी ठरत आहे. हिंदी बोलणारी व मनाने भारतीय असणारी मंडळी आजही पाकिस्तानव्याप्त भागात कठिण जीवन जगत आहे. एक चुक किती महागात पडली हे आज कळून येत आहे. मुळात अहिंदु पाकिस्तानात फाळणीच्यावेळी अतिषय कमी होते. सिंधी, शिख आदि अल्पसंख्याक समजला जाणारा जनसमुदायाच्या मनाविरोधात निर्णय झाला हे अहिंसावादींना कळून आले नाही. वास्तविक ज्यांना फासावर लटकावले हे कृत्य अहिंसाचे होते का? राजगुरू, सुखदेव व भगतसिंह यांची फासी रोखता आली असती. ती का रोखली गेली नाही. असंख्य भारतीयांची हत्त्या झाली. जेलमध्ये अमानविय कृत्य केले. हे कृत्य अहिंसावादी होते का? या बाबत विचार केला पहिजे. त्यामुळे अहिंसेच्या बळावर स्वातंत्र्य मिळाले असे समजणे योग्य नाही. आज सिंध प्रांत जो पाकिस्तानाच्या ताब्यात आहे तेथील बांधव सुखी-समाधानी नाहीत. त्याकडे आपले बांधव म्हणून पाहिले जात नाही. आज अहिंदु भारतात सुखी व समाधानी आहेत, तसे पाकिस्तान हिंदु समाज सुखी, समाधानी व आनंदी नाही. अन्याय, अत्त्याचारास बळी पडत आहे. ही वस्तूस्थिती दिसून येत नसेल तर एक ना एक दिवस सिंध भारतात विलीन होऊ शकते. जे चुकीचे घडले ते घडले, त्यामुळे चुकीवर पांधरून घालण्यापेक्षा चुका कशा सुधारल्या जातील याचा विचार केला पाहिजे. भारतात घुसखोरी करून पाकव्याप्त काश्मीर हा भारताला जोडला पाहिजे. याचा सत्ताधारी व विरोधकांनी विचार केला पाहिजे. पहिल्यांदा ही बाब लक्षात घ्यावी की, अहिंसेच्यामार्गाने भारताला स्वराज्य मिळाले नाही. दिडशे वर्ष लढावे लागेल. रक्ताच्या नद्या वाहिल्या. रक्ताचे पाट वाहिले. फासावर अमानुषपने लटकावले. प्राण घेणे ही मानवता आहे का? ही एक हिंसा आहे हे जनतेला अजूनही कळाले नाही. अहिंसेचा पुजारी कोणाला म्हणावे हेच भारतीयांना कळाले नसेल मोठे दुर्भाग्य आहे. त्यामुळे ना. राजनाथसिंह यांच्या वक्तव्याकडे दुर्लक्ष न करता त्याला देशातील तमाम जनतेनी पाठींबा दिला पाहीजे. सिंध भारतात येईल त्यापुर्वी त्यापुर्वी पाकव्याप्त काश्मीर परत घेतला पाहिजे. भारताची सीमा ही आफगाणिस्तानपर्यंत होती. गांधारी ही अफगाणीस्तानची होती. सीता ही नेपाळची होती याचा अर्थ भारताची सीमा दूरवर होती हे मान्यच केले पाहिजे. तसे पाहिले तर सिंध भारताशी जोडणे अशक्य नाही. केवळ भारतीय जनतेबरोबर सत्ताधारी व विरोधकांची तशी मानसिकता असली पाहिजे. त्यामुळे राजनाथसिंह यांच्या विचाराशी देशातील जनतेनी सहमत झाले पाहिजे. त्याग, बलिदान व रक्ताच्या नद्या स्वातंत्र्यासाठी वाहिल्या आहेत हे विसरता येऊ शकत नाही. याच आठवण सतत ठेवण्याची गरज आहे.

# मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार

## आयआयएमयूएन आयोजित 'युथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

**मुंबई/प्रतिनिधी :, दि. २४ : मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत.**




मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज् इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित 'यूथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील ६० टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेसवे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णतः बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल. 'मुंबई वन' हा एकात्मिक मोबिलिटी ॲप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्युशन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु वास्तवात परिस्थिती बदलत आहे. महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळापेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

लोकशाही अधिक सक्षम आणि सर्व समावेशक करण्यासाठी युवांचा सहभाग अत्यावश्यक आहे. आजच्या लोकशाहीत युवा नागरिक फक्त दर्शक नसून स्वतः चे मत असलेले महत्त्वाचे स्टेकहोल्डर्स आहेत. युवांच्या मतांना स्थान दिल्याशिवाय लोकशाहीची प्रक्रिया पुढे जाऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पर्यावरण बदल ही केवळ पुस्तकी चर्चा नसून वास्तवातील मोठी समस्या आहे. आपण हवामान बदलाचा अनुभव घेणारी पहिली पिढी आहोत आणि त्याबद्दल काहीतरी करू शकणारी शेवटची पिढी आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे असतात, त्यामुळे मुंबईत वाहतूक व्यवस्था इलेक्ट्रिक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो संपूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. पुढील टप्प्यात सार्वजनिक वाहतुकीला पूर्णपणे शून्य-उत्सर्जनच्या दिशेने नेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक वर्षे मुंबईचे सांडपाणी थेट समुद्रात सोडले जात होते, मुंबईसारख्या महानगराचा १०० टक्के सीवेज समुद्रात टाकला जाणे योग्य नाही. त्यामुळे नियम तयार करून आता संपूर्ण मुंबईत सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स उभारत आहोत. पुढील वर्षापर्यंत १०० टक्के ट्रीटेड पाणीच समुद्रात सोडले जाईल. त्याचबरोबर धारावीच्या पुनर्विकासात ३० टक्के क्षेत्र पूर्णपणे अनडेव्हलपेबल ठेवले जाणार असून त्यामुळे प्रचंड प्रमाणात ओपन आणि ग्रीन स्पेसेस निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# गुणपत्रिका न मिळाल्याने करिअर कोलमडले उच्च न्यायालयाचे शिक्षण मंडळाला फटकारे

**मुंबई/प्रतिनिधी** : महाविद्यालय आणि राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय चुकीमुळे एका विद्यार्थ्याला तब्बल नऊ वर्षे योग्य बारावीची गुणपत्रिका मिळाली नाही. या विलंबामुळे त्याचे करिअर गंभीर अडचणीत सापडले यामुळे त्याला व्यावसायिक अभ्यासक्रम ांच्या प्रवेशपरीक्षा देण्याची संधीही गमवावी लागली . शेवटी मुंबई उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करत विद्यार्थ्याला दिलासा दिला असून, आवश्यक शुल्क भरताच त्याला २०१६ च्या परीक्षेची गुणपत्रिका १५ दिवसांत आणि प्रमाणपत्र ३० दिवसांत देण्याचा आदेश न्यायालयाने मंडळ व महाविद्यालयाला दिला आहे.न्यायालयाने आपल्या निर्णयात महाविद्यालय आणि मंडळाच्या सलग चुकांसाठी कठोर शब्दांत ठणकावले न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायम ूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने सांगितले की', संस्थांच्या त्रुटींमुळे विद्यार्थ्याला दंड भोगावा लागणे अन्यायकारक आहे. अशा प्रकरणांत व्यावहारिक दृष्टीकोन ठेवणे अत्यावश्यक असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. सोबतच दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

न्यायालयाने आदेशात म्हटले की, विद्यार्थ्याला गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र देण्यात यावे, जेणेकरून तो कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी या निकालाचा उपयोग करू शकेल. विद्यार्थी ओंकारने २०१६ च्या बारावी परीक्षेचा निकाल घोषित करावा यासाठी २०२३ मध्ये याचिका दाखल केली होती. नोटीस बजावूनही मंडळाने आपली भूमि का स्पष्ट केली नव्हती. ओंकारने २०१४ मध्ये ४५.५४ज्ञब गुणांसह बारावी उत्तीर्ण केली होती. त्यानंतर गुणवत्ता सुधारणा योजनेअंतर्गत त्याने गुण वाढवण्याचा पर्याय निवडला. परंतु २०१५ मध्ये तो गुण सुधारत असताना अनुत्तीर्ण ठरला. त्याच वेळी महाविद्यालयाने त्याचा ऑनलाइन फॉर्म चुकीचा भरला. २०१५ मध्ये 'सुधारणा' विद्यार्थी दाखवण्याऐवजी 'अनुत्तीर्ण' दाखवले गेले. पुढे २०१६ मध्ये तो प्रत्यक्षात 'रिपिटर' असताना त्याला चुकीने 'सुधारणा विद्यार्थी' म्हणून दाखवण्यात आले. दोन्ही चुका महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी २०१८ आणि २०२२ च्या पत्रांमध्ये मान्य केल्या.

.मंडळाकडून त्याला २०१४ च्या मूळ गुणांपैकी किंवा २०१५ च्या गुणांपैकी एक निवडण्याचा पर्याय देण्यात आल्याचा कोणताही पुरावा न्यायालयात सादर करता आला नाही.

गुण वाढले तरी विद्यार्थ्याचे नुकसानच

न्यायालयाने सांगितले की, मंडळाने २०१६ चा निकाल जाहीर न केल्याने विद्यार्थ्याचे नुकसान झाले. २०१६ मध्ये त्याचे गुण ५८.६१ज्ञब पर्यंत वाढले होते. पण निकाल न मिळाल्याने त्याला पुढील शिक्षण आणि प्रवेश परीक्षा दोन्हीपासून दूर राहावे लागले. २०१४ च्या गुणांवर आधारित पीसीबीचे एकत्रित गुण ४५ज्ञब पेक्षा कमी असल्याने तो पात्रताच गाठू शकला नाही. त्यामुळे गुण वाढूनही त्याच्या प्रगतीचा मार्ग बंद झाला.

# रेल्वे प्रशासन कलबुरगि आणि बेंगलूरू छावनी दरम्यान विशेष गाड्या चालवणार




रेल्वे, प्रवाशांच्या सोयीसाठी आठवड्याच्या शेवटी कलबुरगि आणि बेंगलूरू छावनी दरम्यान विशेष गाड्या चालवणार आहे, तपशील खालीलप्रमाणे:

कलबुरगि – बेंगलूरू छावनी विशेष (१२ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०६२०८ कलबुरगि – बेंगलूरू छावनी विशेष २३.११.२०२५ ते २८.१२.२०२५ पर्यंत दर रविवारी कलबुरगि येथून सकाळी ०९:३५ वाजता निघेल आणि त्याच दिवशी रात्री ०८:३० वाजता बेंगलूरू छावनी येथे पोहोचेल. (६ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०६२०७ बेंगलूरू छावनी – कलबुरगि स्पेशल २२.११.२०२५ ते २७.१२.२०२५ पर्यंत दर शनिवारी बेंगलूरू छावनी हून रात्री ०७:२० वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०७:३० वाजता कलबुरगि येथे पोहोचेल. (६ फेऱ्या)

थांबे: येलहंका, हिंदूपूर, धर्मावरम, अनंतपूर, गुंतकल, अदोनी, मंत्रालयम रोड, रायचूर, कृष्णा, यादगीर आणि शहाबाद.

रचना: २० स्लीपर क्लास कोच आणि २ द्वितीय श्रेणीचे सामान-सह-दिव्यांगजन कोच. (२२ कोच)

आरक्षण आणि बुकिंग:

विशेष शुल्कावरील विशेष गाड्यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर खुले आहे.

अनारक्षित कोचचे बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि णढड ॲपद्वारे देखील करता येते. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात येत आहे.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा RailOne किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## लॅपटॉप वांरवार होत आहे का गरम या गोष्टींकडे लक्ष द्या अन्यथा तुमचे होईल नुकसान

व्यवसाय असो वा अभ्यास, लॅपटॉपचा वापर नेहमीच केला जातो. बरेच लोक घरूनही काम करतात, त्यामुळे लॅपटॉपचा वापरही वाढला आहे. अशा परिस्थितीत लॅपटॉप जास्त वेळ वापरल्यास लॅपटॉप गरम होऊ लागतो. तथापि, लॅपटॉप गरम होण्यामागे अनेक कारणे असू शकतात. जर लॅपटॉप थोडा गरम झाला, तर फारसा त्रास होत नाही, पण जर तो जास्त गरम झाला, तर तुम्हाला नुकसान होऊ शकते. त्याम ुळे, लॅपटॉप पुन्हा पुन्हा गरम होत असल्यास काय करावे, हे आम्ही तुम्हाला सांगत आहोत. ही समस्या तुम्ही स्वतः सोडवू शकता, यासाठी तुम्हाला कोणत्याही सेवा केंद्रात जाण्याचीही गरज भासणार नाही.

लॅपटॉपमध्ये व्हेंटिलेशन खूप महत्वाचे आहे, उष्णता नियंत्रित करण्यासाठी लॅपटॉपमध्ये सीपीयू पंखे दिले जातात. हे पंखे वेळोवेळी स्वच्छ न केल्यास समस्या निर्माण होऊ शकतात. फॅनवर धूळ जमा झाल्यामुळे लॅपटॉपच्या आत योग्य वेंटिलेशन शक्य होत नाही, ज्यामुळे तो गरम होऊ लागतो. जर तुम्हाला लॅपटॉपच्या हार्डवेअरबद्दल योग्य माहिती असेल तर सॉफ्ट ब्रशच्या मदतीने तुम्ही सीपीयू आणि कूलिंग सिस्टममध्ये जमा झालेली धूळ स्वतः साफ करू शकता.

तुमचा लॅपटॉप नेहमी मूळ चार्जरनेच चार्ज करण्याचा प्रयत्न करा, खरेतर तुम्ही इतर कोणत्याही कंपनीचे चार्जर वापरत असाल तर त्यामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. लॅपटॉप पूर्ण चार्ज झाल्यानंतरही अनेकजण चार्जर काढत नाहीत. आता तुम्ही लॅपटॉपला ९ तास सतत चार्जिंगवर ठेवल्यास तो जास्त गरम होण्याची शक्यता जास्त असते.

लॅपटॉपमध्ये अनावश्यक ॲप्स ठेवू नका, लॅपटॉपमध्ये एक किंवा दोनपेक्षा जास्त खिडक्या उघड्या ठेवू नका. याचा परिणाम लॅपटॉपच्या कार्यक्षमतेवर होतो. अशा परिस्थितीत, लक्षात ठेवा की तुम्ही अनावश्यकपणे ॲप उघडणार नाही आणि विंडो उघडण्याकडेही लक्ष द्याल.

## व्हॉट्सॲप-इन्स्टाग्रामच्या चॅट बॉक्समध्ये दिसत आहे निळ्या रंगाची रिंग असा होईल त्याचा फायदा

व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्रामवरील निळे चिन्ह हे आर्टिफिशियल इंटेलिजेंस सर्व्हिसशिवाय दुसरे काही नाही. अघ ची ही सुविधा युजर्सच्या सोयीसाठी देण्यात आली आहे. मेटा आपल्या वापरकर्त्यांच्या सोयीसाठी दररोज काही अद्यतनांवर कार्य करते आणि जर ते चाचणी उत्तीर्ण झाले, तर ते वापरकर्त्यांसाठी ते लॉन्च करते. हा रिंग आयकॉन फक्त तुमच्या सोयीसाठी दिला आहे. परंतु ते कसे वापरावे आणि ते काय फायदे देईल हे जाणून घेण्यासाठी खाली वाचा.

वर नमूद केल्याप्रमाणे, हे निळे रिंग आयकॉन एक कृत्रिम बुद्धिमत्ता सेवा आहे, त्यामुळे तुम्ही त्यासह बरेच काही करू शकता. याद्वारे तुम्ही तुमच्या अनेक समस्या सोडवू शकता. यावर तुम्हाला कोणत्याही प्रश्नाचे उत्तर मिळू शकते, एवढेच नाही तर त्यावर तुम्ही फोटोही तयार करू शकता.

यामध्ये तुम्ही तुम्हाला हवा, तो फोटो तयार करू शकता. यासाठी तुम्हाला फक्त चॅटबॉक्समध्ये एक प्रॉम्प्ट लिहून पाठवावा लागेल. अघ तुमचा प्रॉम्प्ट वाचून ती प्रतिमा तयार करेल आणि तुम्हाला देईल. जर मेटा एआयला ती इमेज समजत नसेल, तर तो तुम्हाला संदेश पाठवतो की तो हा फोटो जनरेट करू शकत नाही.

यासाठी तुम्हाला फक्त या रिंग आयकॉनवर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला परवानगी द्यावी लागेल, आता चॅट तुमच्यासमोर सामान्य चॅट बॉक्सप्रमाणे उघडेल. येथे तुम्ही इच्छित प्रश्न विचारू किंवा लिहू शकता आणि तुम्हाला तयार करायच्या असलेल्या फोटोसाठी प्रॉम्प्ट देखील लिहू शकता. यावर तुम्हाला तुमचा प्रॉम्प्ट छोट्या शब्दात लिहावा लागेल जो अघ वाचू शकेल आणि तुम्हाला तयार करायचा फोटो मिळेल. त्यावर तुम्हाला जी डिश बनवायची आहे त्याची रेसिपीही तुम्ही विचारू शकता. या फीचरनंतर तुम्हाला कोणत्याही वेगळ्या अख प्लॅटफॉर्मचा अवलंब करावा लागणार नाही. हे तुमची सदस्यता खर्च देखील वाचवेल. तुम्ही फोटो तयार करू शकता आणि तुमच्या प्रश्नांची उत्तरे फक्त खपींरसीरा आणि थहरींअर्शिवर जाणून घेऊ शकता.

तुम्हाला अद्याप हे अपडेट मिळाले नसल्यास, तुमचे ॲप अपडेट करा. यानंतरही शो झाला नाही तर काही दिवस थांबा, लवकरच तुम्हाला ही सेवा वापरता येणार आहे.

## इंटरव्ह्यूमधील सहजता

इंटरव्ह्यूच्या बाबतीत आपण लक्षात ठेवायची आणि इंटरव्ह्यू घेणारे लोक आपल्याला सांगत नाहीत अशी एक गोष्ट आहे. ती म्हणजे इंटरव्ह्यूचे काही शास्त्र नाही आणि असले तरी इंटरव्ह्यू घेणार्?यांना उत्तम इंटरव्ह्यू कसा घ्यावा याचे परिपूर्ण ज्ञान असतेच असे नाही. म्हणजेच इंटरव्ह्यू घेऊन उमेदवाराकडून त्याच्याविषयी जास्तीत जास्त माहिती कशी मिळवावी याचे तंत्र आणि शास्त्र सगळ्याच इंटरव्ह्यू घेणार्?यांना माहीत असते असे नाही. त्यामुळे इंटरव्ह्यू देणार्?या उमेदवारांनी मनावर ङ्गारसा दबाव येऊ न देता सहजतेने इंटरव्ह्यू दिला पाहिजे आणि असे उमेदवार यावेळी ज्या चुका करतात त्या चुका टाळल्या पाहिजेत. एखादी मुलाखत झाल्यानंतर कंपनीच्या व्यवस्थापकांना धन्यवाद देणारे पत्र पाठविले पाहिजे. आपल्याला ती नोकरी मिळणार असो की नसो म्हणजेच आपण मुलाखतीत पास असो की नापास असो आपले एक पत्र गेले पाहिजे. त्यात आपल्याला मुलाखत देण्याची संधी दिली याबद्दल व्यवस्थापनाचे आभार मानले पाहिजेत. हा एक चांगल्या उपचाराचा भाग आहे. त्याशिवाय आपल्या त्या कंपनीच्या त्या विशिष्ट नोकरीत रस आहे हेही त्यातून दिसून येते. अशा प्रकारच्या पत्रामध्ये केवळ धन्यवादाचा उपचार कोरडेपणाने पार पाडण्यापेक्षा इंटरव्ह्यूच्या दरम्यान निर्माण झालेल्या किंवा उपस्थित झालेल्या एखाद्या मुद्याची चर्चा करावी. काही वेळा असा मुद्दा किंवा आपल्या विषयीची विचारणा अचानकपणे झालेली असते. आपण तिच्याबाबतीत काही तयारी केलेली नसते. काही वेळा आपण एका पदासाठी म्हणून इंटरव्ह्यूला जातो आणि तिथे इंटरव्ह्यूच्या दरम्यान आपल्याला दुसरी एखादी जबाबदारी स्वीकारण्याची ऑङ्गर दिली जाते. अशा वेळी आपल्या दृष्टीने ती ऑङ्गर अनपेक्षित असल्याने आपण योग्य उत्तर देऊ शकलेलो नसतो. इंटरव्ह्यू संपल्यानंतर आपल्याला त्याची रुखरुख लागून राहते. अशा प्रकारचे अपुरे राहिलेले उत्तर आणि त्याविषयीचा खुलासा नंतर पत्रातून करावा. त्याचाही एक वेगळा परिणाम आपल्या विषयीच्या निर्णयावर होऊ शकतो. अशा रितीने पत्र लिहिण्याम ध्ये आपला प्रांजळपणा तर व्यक्त होतोच परंतु आपला पोक्तपणाही दिसून येतो.

# तथागत गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान : जन्म आणि मृत्युदरम्यानचा शोध



परामर्श, डॉ. दीपक बोरगावे

परवाच एका हॉस्पिटलमध्ये अगदी तरणाबांड, स्वतः डॉक्टर असलेला आणि विद्यापीठात वैद्यकीयशास्त्र शिकवणारा प्राध्यापक अर्धांगवायुने पछाडला होता. नेहमीचे इंजेक्शन घेण्यासाठी तो तिथे आला होता. त्याच्या हातात काठी होती. ही अशी भयग्रस्त करणारी चित्रे आपल्या भोवताली रोजच दिसत आहेत. या सगळ्याच गोष्टींमुळे एकूणच सगळी भयंकर परिस्थिती उद्भवलेली असताना सर्वसाधारण जनतेच्या मनात आपल्या आयुष्याबद्दल आज काहीही भरोसा राहिलेला नाही.

मृत्यू हा चर्चेचा आणि विचार करण्याचा विषय असू शकतो याची जाणीव सांगलीचे प्रसिद्ध डॉक्टर रवींद्र श्रावस्ती यांच्या 'मृत्यू सुंदर आहे !?' या पुस्तकात वाचायला मिळाली. कदाचित मृत्यूशय्येवर असणार्यांना त्यांनी पाहिले असावे. या पुस्तकाच्या शीर्षकात उद्गारवाचक आणि प्रश्न अशी दोन चिन्हे एकाच वेळी वापरलेली आहे. हे कदाचित अ-व्याकरणीय असू शकते. 'मृत्यू' हा 'सुंदर' कसा काय असू शकतो? ही आश्चर्याची भावना उद्गारवाचक चिन्हातून आली आहे. याचबरोबर हा प्रश्नदेखील असू शकतो म्हणून तिथे प्रश्नचिन्हही आले आहे. या पुस्तकात डॉक्टर श्रावस्ती यांनी 'मृत्यूचे सौंदर्यशास्त्र' लिहिले आहे. ते सारे मुळातून वाचण्यासारखे आहे.

बुद्धासाठी मृत्यू हा भयाचा नव्हे, तर बोधाचा क्षण आहे. मृत्यू हा जीवनाच्या विरुद्ध नाही, तर तो आपले जीवन सुंदर करू शकणारा क्षण होऊ शकतो. मरणाच्या शेवटच्या क्षणाला बुद्धाचे हेच उद्गार होते: 'मृत्यू किती सुंदर आहे!' मृत्यू हा अपरिहार्य आहे; तो कोणालाच टाळता येणारा नाही. म्हणून त्यात पूर्णत्वाची भावना शोधता येते का याचा विचार बुद्धाने केला होता.

**अनित्यता –**

मानवी अस्तित्वाचे मूळच अनित्यता आहे- 'सर्वं खं अनिच्चं' असे पाली भाषेत बुद्धाचे शब्द आहेत. या अनित्यतेचे गूढ समजून घेणे म्हणजे मुक्तीचा मार्ग ओळखणे. बुद्धानी मृत्यूकडे पाहताना 'शेवट' नव्हे, तर 'जीवना-तील पूर्णत्वाचा क्षण' म्हणून पाहिलेले आहे. ते म्हणतात, 'जो मृत्यूचा विचार न करता जगतो, तो आयुष्याचा विचार करू शकत नाही.' या दृष्टिकोनातून पाहिल्यास, बुद्धाचे संपूर्ण तत्त्वज्ञान म्हणजे जीवन आणि मृत्यू या दरम्यानचा शोध आहे. मरणाचे भान म्हणजेच जीवनाचे भान. या भानातच करुणा, प्रज्ञा आणि शांती जन्म घेतात. बुद्धाचे तत्त्वज्ञान आपणाला हेच शिकवते. आपण भयमुक्त होऊन मरणाला समजावून घ्यायला हवे. मृत्यूची जाणीव म्हणजे जीवनाच्या सारांशाशी झालेली भेट आहे असे म्हणता येते. या भेटीत भयाचा लोप होतो आणि आपले अस्तित्व निश्चल व शांततेत रूपांतरित होते. 'अनिच्चा' ('अनित्यता' हे 'अनिच्चा' या पाली शब्दाचे संस्कृत रूप आहे) हा बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. अनिच्चा म्हणजे सर्व काही क्षणभंगुर आहे. 'सर्वं खं अनिच्चं' हे केवळ तात्त्विक विधान नाही; ते जीवन आणि मृत्यू समजून घेण्याची मूलभूत दृष्टी आहे. जन्म, बालपण, तारुण्य, वृद्धत्व आणि मृत्यू-ही एक अखंड शृंखला आहे, जगात काहीही स्थिर नाही. बुद्ध म्हणतात, 'जे बदलत नाही ते मरण पावलेले असते, आणि जे जिवंत आहे ते सतत बदलत असते.' माणसाला अनिच्चेच (अनित्यता) भान आले की माणूस जगाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहू लागतो. मग मृत्यू हे 'भय' न राहता, ते एक नैसर्गिक संक्रमण बनते. पान कोमेजून पडते, तेव्हा झाड मरत नाही, तर नव्या पानांच्या जन्मासाठी जागा तयार होते. हेच बुद्धांचे तत्त्वज्ञान आहे. मृत्यू म्हणजे नाश नव्हे, तर रूपांतर. या अनित्यतेचे सम्यक् ज्ञान झाले की, माणूस 'हे माझे; ते माझे' या मोहातून मुक्त होतो. मृत्यूचा विचार मग दुःखद वाटत नाही, तर तो करुणेचा आणि समजुतीचा भाग होतो. म्हणूनच बुद्ध म्हणतात, 'जो अनिच्चा जाणतो, तो दुःखातून मुक्त होतो.' कारण अनित्यतेचा स्वीकार म्हणजेच जीवनाच्या सर्व परिवर्तनांशी एकरूप होणे आहे. हे एकरूप होणे म्हणजेच खर्या अर्थाने मुक्तीची सुरुवात आहे.

**करुणा**

करुणेचा मृत्यूशी संबंध काय? करुणा ही केवळ एक भावना नव्हे, तर अस्तित्वाचा केंद्रबिंदू आहे. या करुणेचा मृत्यूशी अतिशय घनिष्ठ संबंध आहे. कारण ज्याला मृत्यू समजतो, तोच दुसर्याच्या दुःखाकडे खर्या अर्थाने पाहू शकतो. मृत्यूचे भान म्हणजेच दुसर्याच्या नश्वरतेचे आणि असाहायतेचे भान. याच जाणिवेतूनच करुणा जन्म घेते. बुद्ध दुःखाबद्दल सांगतात, 'प्रत्येक जिवंत प्राणी -माणूस, पशू, कीटक आदी हा मृत्यूच्या दिशेने चाललेला आहे. म्हणून प्रत्येक जीवावर करुणा करावी. आपण सर्व एका अनिवार नियतीचे प्रवासी आ-होत.' मृत्यू समजल्याशिवाय करुणा निर्माण होत नाही. जो मृत्यूकडे दुर्लक्ष करतो, तो दुसर्याच्या वेदनेकडेही दुर्लक्ष करतो. ही करुणा म्हणूनच केवळ वैयक्तिक नाही; ती इतरत्वाच्या (चळीशीू ेष जींहशीपर्शीी) वेदनेशी जोडलेली आहे.

बुद्धाची करुणा ही म्हणूनच निर्लेप आणि विशाल आहे. ती कोणत्याही एका जीवासाठी नव्हे, तर सर्व जीवांसाठी आहे. मृत्यू हा तिचा पाया आहे. जेव्हा आपण मृत्यूला स्वीकारतो, तेव्हा आपला 'अहं'चा (एसे) नाश जरी झाला नाही, तरी तो कमी नक्कीच होतो. आपण स्वतःला आणि इतरांना कमी दोष देतो. आपल्यात क्षमा आणि दयाभाव वाढतो. करुणा म्हणजे मृत्यूच्या स्वीकारातून जन्मलेली प्रज्ञा. ती सांगते की 'मी आणि तू' वेगळे नाही; आपण दोघेही नश्वर आहोत. म्हणून एकमेकांना धरून राहू.' बुद्धाच्या करुणेची मूळ प्रेरणा मृत्यूचा स्वीकार आहे. यातून मानवी जीवन अधिक प्रेमळ होऊ शकते. बुद्धाच्या तत्त्वज्ञानात करुणेचा मृत्यूशी असा संबंध लावता येतो.

करुणा ही केवळ भावनिक दयाभाव नाही, तर ती मृत्यूच्या जाणिवेतून आलेली खोल समज आहे. कारण ज्याला मृत्यूचे तात्विक अर्थाने आकलन होते, त्यालाच जीवन समजते अशी एक धारणा बुद्धिझममध्ये आहे. मृत्यूचे भान आल्यावर 'मी' आणि 'तू' यातली भिंत कमी होते. आपल्यात क्षमा आणि समज वाढते. करुणा म्हणजे या भिंती विरघळण्याची प्रक्रिया आहे. बुद्ध म्हणतात, 'जो मृत्यू जाणतो, तो द्वेष करीत नाही.' म्हणूनच बुद्धांची करुणा सर्वव्यापी आहे. मृत्यू हा करुणेचा आरंभबिंदू आहे. तो मृत्यूचा स्वीकार करतो, तोच जीवनाकडे प्रेमाने, शांततेने आणि सहानुभूतीने पाहू शकतो.

बुद्धाने शिकवलेली 'मरनसती' (चरीरपर-डरींळ) ही मृत्यूच्या भीतीवर विजय मिळवण्याचा मार्ग आहे. मृत्यू म्हणजेच जागरूकता, स्मरण, सज-गता. मृत्यूचे स्मरण हे निराशेचे नाही. ते सजगतेचे आहे. मरनसती साधना म्हणजे मृत्यू हा प्रत्येक क्षणात सामावलेला आहे. जसा श्वास आत घेतला, तसाच तो पुन्हा बाहेर सोडला जातो. या दोन्हींच्यामध्ये जीवनाचा क्षण असतो. मरणाचे स्मरण केल्याने जीवन अधिक सजग, साधे आणि प्रामाणिक होते. बुद्ध म्हणतात, 'मृत्यूची जाणीव ही दुःख नव्हे, तर ते मुक्तीचे दार आहे. जो मृत्यूचा विचार करतो, तो खरोखरच जगतो.' म्हणूनच 'मरनसती' ही मृत्यूकडे पाहण्याची एक नवी दृष्टी आहे. ती भयाकडे नव्हे, तर शांततेकडे नेते.

निर्वाण -निर्वाण म्हणजे बाह्य जगातून पलायन नव्हे, तर जगाला शांतपणे स्वीकारण्याची ही अवस्था आहे. मृत्यूची तिथे भीती संपते. कारण 'मी' आणि 'माझे' याची आसही इथे संपलेली असते.बुद्धाच्या तत्त्वज्ञानात मृत्यू म्हणजे शेवट नव्हे, तर मुक्तीचा क्षण आहे. पण ही मुक्ती शरीराच्या मरणाने मिळत नाही. ती मिळते अहंकाराच्या मरणाने. बुद्ध म्हणतात, 'जो स्वतःला सोडतो, तोच खरा मुक्त होतो.'

माणसाचे सर्व दुःख हे 'मी जिवंत राहावे', 'माझं टिकावे' या आसक्तीतून जन्मते. ही आसक्तीच (ऊीरींळपस) दुःखाचा प्रमुख स्त्रोत आहे. याचा जेव्हा लोप होतो, तेव्हाच निर्वाण शक्य होते. म्हणून मृत्यू ही केवळ शारीरिक घटना नसून, ती अंतर्मनातील आसक्तीचा शेवट आहे असे बुद्धांनी म्हटले आहे. या अर्थाने मृत्यू म्हणजे आतली शांतता. निर्वाणात ना जन्म आहे; ना मृत्यू. कारण तिथे 'मी' नाही. ही अवस्था म्हणजे पूर्ण स्वीकृतीची, गाढ शांततेची अवस्था आहे. म्हणून बुद्धाच्या दृष्टीने मृत्यू हा भीतीचा नव्हे, तर शांततेचा दरवाजा आहे.

बुद्धाच्या तत्त्वज्ञानातील बर्याच गोष्टी उपनिषदे आणि वेदात आलेल्या आहेत. त्यात नंतर बर्याच गोष्टी घुसडण्यात आल्या. आत्मा अमर आहे, पुनर्जन्म, अध्यात्म, आत्मवाद वगैरे. तत्त्वज्ञानात आत्मवाद आणि आत्मावाद याची चर्चा आहे. वेदांनी 'आत्मवादाचे' समर्थन केलेले आहे. आत्मवाद हा व्यक्तीप्रधान आहे. पण आत्मावाद हा समष्टीप्रधान आहे. हा यातला प्रमुख भेद आहे. आत्मा, आत्म्याचे अमरत्व, पुनर्जन्म या सर्व गोष्टी बुद्ध नाकारतो.

हे बर्याच जणांनी वाचलेले असते किंवा त्याबद्दल पुसटशी माहिती असते. पण तरीदेखील, जीवनाची आस, आसक्ती ही काही संपत नाही. उलट ती वाढतच जाते. मग आपण निर्वाणापर्यंत कधीच पोचत नाही. कवीश्रेष्ठ ग्रेस यांचे 'भय इथले संपत नाही' हे शब्द मग आपण आळवत राहतो.

## हेच आहे का आपल्या बालकांना शिक्षणाचे हक्क



आज बालकांना स्वतः च्या शिक्षणाचा हक्कासाठी हातातील पाटी पुस्तके सोडुन आदोंलन मोर्चे काढावे लागत आहे हे फार दुर्दैवी आहे.छत्रपती शाहु फुले आंबेडकरच्या विचाराच्या देशांत असे घडवू नये.हेच आहे का डिजिटल भारत - आत्मनिर्भर भारत किती ही योजना राबविल्या तरी ते फक्त कागदात आहे प्रत्यक्ष नाही. पट संख्या कमी असेल तर शाळा बंद हे कोणते नियम करोडपती आमदार खासदार मंत्री याना पेंशन मिळणार सोबतच सर्व शासकीय सोय सुविधा मोफत त्याना पेंशन देताना कोणतेच अट नाही पण विधवा पेंशन - ज्येष्ठ नागरीक पेंशन - इत्यादी असह्य लोकांना शासकीय योजनातील पेंशन योजना देताना खुप अटी शर्ती असतात म्हणजे पेंशन मिळवू नयेच अशी योजना असते मिळालेच तरी अत्यल्प ११०० रू महिना आणि या माजी आमदार खासदार मंत्री याना कमीत कमी पन्नास हजार रू (५०.०००) महिना पेंशन तसेच माजी म्हणून इतर शासकीय योजनाच्या लाभ ही घेत असतात.गरिबांना रेशनचे दुकान हे सरकारी योजना म्हणून आहे पण धान्याची गुणवत्ता तर नाहीच.आमदार खासदार मंत्री यानी रेशन चे धान्य यानी खावावे तर कळणार सोबत याच्या शासकीय निवास्थ-ानात मोफत वीज पाणी टेलिफोन, जेवनाची मेजवानी मोफत विमान रेल्वे वाहतुक,वाहनाला लाखोच्या कर्ज तेही अगदी मोफत अशी अनेक सुविधा हे राजकीय पुढाकारी घेत असतात. तेव्हा राज्याचा किंवा देशांच्या बजेट बिघडत नाही.पण सामन्याला त्याचा हक्काच्या शिक्षण आरोग्य घर विज पाणी सुरक्षा रस्ते इत्यादी देताना सरकारच्या बजेट बिघडला जातो.सरकारचे पैसे आम जनतेच्या करातून आ-लेला असतो.विद्यार्थी एक असो किंवा अनके विद्यार्थी हेच देशांचे भवितव्य घडवत असतात.

शासनाच्या या निर्णायाला सर्वच वर्गातून कडकडून विरोध आहे. सरकारने जागे व्हावे व बालकांच्या हक्काची शाळा बंद करू नये असे शासन निर्णय रद्द करण्यात यावे नाहीतर येणार्या पुढिल विधानसभा व लोकसभा निवडणुकीत याना त्याची जागा ही आम जनता दाखवून दिल्या शिवाय राहणार नाही.

आपले नम्र अमित साळुंखे (बी.ए,बी.एड्) ९६६४१९९९९७,
युवक अध्यक्ष-मुंबई प्रदेश

## 1 या ५ चुकांमुळे वैवाहिक जीवन होऊ शकते बरबाद

अनेकदा पार्टनर्स आपल्या सेक्स लाइफबद्दल बोलण्यात लाजतात आणि त्यामुळे मजा बिघडतो. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे संवाद. आणि या व्यतिरिक्त काय कारणं आहेत ज्यामुळे सेक्स लाइफ बरबाद होऊ शकते जाणून घ्या:



**१)पुढाकार न घेणे/लाज वाटणे**

आपण लाजाळू किंवा संकोची असाल आणि इच्छा असली तरी पुढाकार घेत नाही अशात योग्य वेळ टळते. इच्छा असल्यावर पुढाकार घेऊन पार्टनरला त्यासाठी तयार केल्याने त्यानंतर मिळणार मजा औरच असेल. संबंध सुरू करताना किंवा त्या दरम्यान आपल्याला काय हवं, आपली आवड काय हे सांगण्यात लाज वाटत असल्यास आपल्या मर्जी कधीच पूर्ण होऊ शकणार नाही. आपली आवड आणि कल्पना पार्टनरसोबत शेअर केल्याशिवाय मजा येणार तरी कसा.

## 2 विनोद




शाळा तपासनीस नारायण नावाच्या मुलाला विच-ारतात, ङ्गबाळा काय तुझं नाव?फ
तो उत्तरतो, ङ्गनारूफ
त्यावर ते म्हणतात, ङ्गबाळा नारायण म्हणावे.फ
हाच प्रश्न राम नावाच्या मुलाला विचारल्यावर तो लगेच उत्तर देतो, ङ्गराम ायणफ!

## 3 संदेश

Pati: aaj sunday hai aur aish karna. movie ke liye 3 ticket laayaa hoon.
Patni: teen kyu?
Pati: tumhe aur tum-haare maata pitaa ke liye.

## 4 सुविचार

**बोलुन विचार करण्यापेक्षा बोलण्यापुर्वीच विचार केलेला बरा.**

- अज्ञात




### संस्कृत सुभाषित

**विद्या नसे ज्या तप दान नाही । न ज्या गुण ज्ञान न शील काही ॥**
**न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ॥**

**अर्थ :** त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात महत्वाचे

### ऋतुराज की जैस्वाल? वनडेत ओपनिंग कोण करणार?



मुंबई-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील २ कसोटी सामन्यांची मालिका झाल्यानंतर, दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या मालिकेतील पहिला सामना ३० नोव्हेंबरला खेळवला जाणार आहे. कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात दुखापतग्रस्त झालेला शुबमन गिल अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यामुळे या मालिकेत भारतीय संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी केएल राहुलकडे सोपवण्यात आली आहे.शुबमन गिलच्या अनुपस्थितीत, यशस्वी जैस्वाल आणि ऋतुराज गायकवाड यांचा देखील या संघात समावेश करण्यात आला आहे. दरम्यान रोहित शर्मासोबत डावाची सुरूवात कोण करणार? जाणून घ्या.या संघात आणखी काही खेळाडूंना पुनरागमन करण्याची संधी देण्यात आली आहे.

### ऑस्ट्रेलियाने इंग्लंडला फक्त दीड दिवसांत लोळवले

पर्थ -ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील अॅशेस २०२५-२६ मालिकेचा थरार सुरु झाला आहे. पर्थमध्ये झालेला पहिला कसोटी सामना अवघ्या दीड दिवसांत संपला. त्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाला मोठा आर्थिक फटका बसला. चौथ्या डावात ट्रॅव्हिस हेडच्या तुफानी शतकामुळे दुसऱ्याच दिवशी निकाल लागला. पर्थच्या ऑप्टस स्टेडियमवर शुक्रवारी आणि शनिवारी प्रेक्षकांनी अक्षरश: तुफान गर्दी केली.ऑस्ट्रेलियाने हा सामना ८ विकेट्सने जिंकला, पण हा विजय त्यांच्यासाठी महागडा ठरला आहे. सामन्याचा निकाल केवळ दोन दिवसात लागल्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाला जवळपास १७.३५ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागणार आहे. कारण या कसोटीच्या तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या दिवसासाठीची सर्व तिकिटे आधीच विकली गेली होती. आता सामना वेळेपूर्वी संपल्याने त्या दिवसांसाठीचे तिकिटांचे पैसे परत करावे लागणार आहेत.

### बोर्डाला १७.३५ कोटींचे नुकसान, कारण काय?

पर्थ -इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघातील अॅशेस मालिकेतील पहिला कसोटी सामना दोन दिवसांत संपला. गोलंदाजांनी शानदार कामगिरी केली आणि विकेट्स सतत पडत राहिल्या. यामुळं सामन्याच्या जलद निकालाला हातभार लागला आणि ऑस्ट्रेलियानं हा सामना ८ विकेट्सनं जिंकला. अॅशेससारख्या महत्त्वाच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा विजय ही खूप चांगली बातमी आहे. मात्र, ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाला करोडोंचं मोठं नुकसान झालं आहे.क्रिकेट ऑस्ट्रेलियाचा नुकसान : ऑस्ट्रेलियाच्या विजयानंतरही क्रिकेट बोर्ड फारसे आनंदी नसल्याचं दिसतंय. अॅशेस पाहण्यासाठी हजारो चाहते स्टेडियममध्ये आले होते. पहिल्या दिवशी ५१,५३१ प्रेक्षक आणि दुसऱ्या दिवशी ४९,९८३ प्रेक्षक उपस्थित होते. एबीसी स्पोर्ट्सच्या अहवालानुसार, तिसऱ्या आणि चौथ्या दिवसाचा खेळ होणार नसल्यामुळं क्रिकेट ऑस्ट्रेलियाला अंदाजे ३ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्सचं नुकसान झालं आहे, जे भारतीय रुपयांमध्ये अंदाजे १७.३५ कोटी रुपये आहे.

### अंतिम फेरीत जपानच्या युशी तनाकाचा पराभव

नवी दिल्ली-भारताचा स्टार शटलर लक्ष्य सेननं ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटन २०२५ चं विजेतेपद जिंकलं आहे. त्यानं अंतिम सामन्यात जपानचा दिग्गज बॅडमिंटनपटू युशी तनाकाचा पराभव केला. सेननं या अंतिम सामन्यात सरळ सेटमध्ये (२१-१५, २१-११) जेतेपद जिंकलं. यासह सेननं त्याचा जेतेपदाचा दुष्काळ संपवला. लक्ष्यचं या हंगामातील हे पहिलं जेतेपद आहे. यासह, सेन या हंगामातं इ जेतेपद जिंकणारा फक्त दुसरा भारतीय ठरला. अंतिम फेरीत चम कला लक्ष्य सेन : ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष एकेरी बॅडमिंटन सुपर ५०० स्पर्धेच्या अंतिम फेरीत, १३व्या मानांकित लक्ष्य सेनचा सामना जपानच्या २७व्या मानांकित युशी तनाकाशी झाला. लक्ष्यच्या तुलनेत तनाका फिका दिसत होता. लक्ष्यनं पहिला सेट २१-१५ असा जबरदस्त जिंकला आणि नंतर दुसऱ्या सेटमध्ये त्याच्या प्रतिस्पर्धाला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. दुसरा सेट २१-११ असे जिंकून जेतेपद पटकावले. यासह, लक्ष्य सेननं २०२५ मधील त्याचे पहिले विजेतेपद जिंकले आहे.

सामन्यात सुरुवातीपासून वर्चस्व : लक्ष्यने

# भारतीय महिला कबड्डी संघाने दुसऱ्यांदा वर्ल्ड कपवर कोरलं नाव

भारतीय संघाने महिला कबड्डी वर्ल्ड कप स्पर्धेच्या अंतिम सामन्यात चायनीज तैपेइला पराभूत करून ट्रॉफीवर नाव कोरलं



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** नोव्हेंबरचा महिना भारतीय महिला खेळाडू गाजवताना दिसत आहेत. २ नोव्हेंबर रोजी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील भारतीय महिला क्रिकेट संघाने वनडे वर्ल्ड कप २०२५ स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिला अंध महिला टी२० वर्ल्ड कप २०२५ जिंकला.

त्यानंतर आता कबड्डीमध्ये भारतीय महिलांनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकावला आहे. भारतीय महिला कबड्डी संघाने सोमवारी (२४ नोव्हेंबर) सलग दुसऱ्यांदा वर्ल्ड कप जिंकला. ढाकामध्ये झालेल्या महिला कबड्डी वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने चीनी तैपेई संघाला पराभूत केले. भारताने चीनी तैपेई संघाला ३५-२८ अशा फरकाने मात देत वर्ल्ड कपवर नाव कोरले. भारतीय महिला संघाच्या या विजयानंतर सध्या त्यांचे देशभरातून कौतुक होत आहे. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी चांगली झुंज दिली होती.

सुरुवातीला चीनी तैपेईने भारताच्या बचावाला आव्हान दिले होते. पण भारतीय बचावपटूंनी चांगले टॅकल केले. तसेच चढाईपटूंनीही मोक्याच्या क्षणी पॉइंट्स मिळवले. पहिल्या हाफमध्ये सामना चुरशीचा सुरू असतानाच शेवटचे काही क्षण उरले असताना संजू देवीने केलेल्या सुपर रेडने सामन्याला कलाटणी दिली. भारताने तिथून मिळव-लेली लय कायम ठेवली. त्यामुळे भारतीय महिला संघाला विजेतेपद जिंकणे सहज सोपे गेले. मात्र या सामन्यात भारताची कर्णधार रितू नेगी टॅकल करताना दुखापतग्रस्त झाली होती. पण भारतीय संघाने हार न मानता तिच्या अनुपस्थिततही उर्वरित सामन्यात चांगला खेळ केला.

भारतीय संघ या संपूर्ण स्पर्धेत अपराजित या स्पर्धेत ११ संघ सहभागी झाले होते. भारताने साखळी फेरीतही चारही सामने जिंकले होते. त्यानंतर उपांत्य फेरीत इराणला ३३-२१ अशा फरकाने पराभूत करत अंतिम सामना गाठला होता. चीनी तैपेई संघाने उपांत्य फेरीत यजमान बांगलादेश संघाला २५-१८ अशा फरकाने पराभूत करत अंतिम सामन्यात प्रवेश केला होता.

दरम्यान भारतीय संघ अंतिम सामनाही जिंकून या संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहिला आहे. भारतीय महिला कबड्डी संघाचे हे २०२५ वर्षातील तिसरे मोठे विजेतेपद आहे. भारतीय संघाने मार्चमध्ये आशियाई महिला कबड्डी चॅम्पियनशीप स्पर्धाही जिंकली होती.

## ऑलिंपिक २०३६ हे भारताचे स्वप्न : नीता अंबानी



पुणे : एफ आय सी सी आयच्या १५ व्या ग्लोबल स्पोर्ट्स समिट 'टर्फ २०२५' आणि 'इंडिया स्पोर्ट्स अवॉर्ड्स २०२५'मध्ये रिलायन्स फाऊंडेशनला क्रीडा क्षेत्रा-तील योगदानासाठी सन्मानित करण्यात आले. नीता एम. अंबानी यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स फाऊंडेशनने तळागाळापासून उच्च-प्रदर्शन पातळीपर्यंत क्रीडा क्षेत्र सशक्त करण्यासाठी सातत्यपूर्ण काम केले आहे. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या नेतृत्वामुळे नीता अंबानी यांना देशाच्या 'उदीयमान स्पोर्ट्स लीडर' म्हणूनही पाहिले जाते. रिलायन्स फाऊंडेशनला 'बेस्ट कॉर्पोरेट प्रमोटिंग स्पोर्ट्स - हाय परफॉर्मन्स' हा पुरस्कार प्रदान करताना ऋखउउख ने म्हटले, हा पुरस्कार फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती नीता एम. अंबानी यांना त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण विचारांसाठी आणि नेतृत्वासाठी दिला जात आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीत सदस्य होणार्या पहिल्या भारतीय महिला म्हणून त्यांनी जागतिक ऑलिंपिक चळवळीला बळकटी देण्यात आणि भारताच्या क्रीडा आकांक्षा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स फाऊंडेशनने तळागाळातील उपक्रमांपासून ते एलिट अॅथलीट विकासापर्यंत अनेक परिवर्तनकारी कार्यक्रम राबवले आहेत. नीता अंबानी यांनी हा पुरस्कार रिलायन्स फाऊंडेशन परिवाराला आणि देशातील तरुण खेळाडूंना समर्पित केला. पुरस्कार स्वीकारताना त्या म्हणाल्या, येणारे दशक भारतीय क्रीडाजगताचे सुवर्ण दशक ठरणार आहे. भारताला जागतिक मल्टी-स्पोर्टिंग पॉवरहाऊस बनवण्याची ही योग्य वेळ आहे. २०३६ ऑलिंपिक गेम्सचे आयोजन करणे हे १.४ अब्ज भारतीयांचे सामूहिक स्वप्न आहे, आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशन कटिबद्ध आहे. नीता अंबानी यांनी सांगितले की, रिलायन्स फाऊंडेशनच्या क्रीडा उपक्रमांनी देशभरातील २ कोटी ३० लाखांहून अधिक युवकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम केला आहे. शालेय स्तर, तळागाळातील क्रीडा, किंवा उच्च-प्रदर्शन प्रशिक्षण केंद्र-प्रत्येक ठिकाणी युवकांना क्रीडेशी जोडण्यात आले आहे.

# विजेत्या संघात महाराष्ट्राच्या गंगा कदमचा सिंहाचा वाटा

अंध महिला क्रिकेट विश्वचषकात भारताचा ऐतिहासिक विजय

मुंबई : भारतीय अंध महिला क्रिकेट संघाने कोलंबो, श्रीलंका येथे आयोजित पहिल्या विश्वचषक स्पर्धेत इतिहास रचत अजिंक्यपद पटकावले आहे. भारतासह अमेरिका, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, नेपाळ आणि पाकिस्तान या सहा देशांच्या स्पर्धेत भारताने सर्व प्रतिस्पर्ध्यांचा दणदणीत पराभव करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. अंतिम सामन्यात भारताने नेपाळचा पराभव करत ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

या सुवर्णयशात महाराष्ट्राच्या गंगा कदम हिच्या नेतृत्वगुणांचा आणि खेळातील सातत्यपूर्ण योगदानाचा मोठा वाटा आहे. मराठवाड्यातील मर्यादित आर्थिक परिस्थितीतून आलेल्या गंगा ही सात बहिणी आणि एक भाऊ असा मोठा परिवार सांभाळत आपल्या मेहनतीने राष्ट्रीय ते आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकली आहे. भारतीय संघाची उपकर्णधार म्हणून तिने आपल्या संघाला उंच भरारी घेण्यासाठी प्रेरित केले. महाराष्ट्र संघाची कर्णधार म्हणूनही तिने यापूर्वी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

आपत्ती व्यवस्थापन उपकरणे गंगा कदमसह संपूर्ण संघाला शासनाकडून यथोचित सन्मान, प्रोत्साहन आणि खेळाडू म्हणून अधिकृत मान्यता मिळावी, अशी क्रीडा क्षेत्राकडून अपेक्षा व्यक्त होत आहे. महाराष्ट्र सरकारने राज्याचा गौरव वाढविणाऱ्या खेळाडूंसाठी प्रोत्साहनात्मक योजना आखल्या असल्या, तरी गंगा कदमच्या प्रकरणी तातडीने सकारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

मुंबई ही क्रिकेटची पंढरी मानली जात असताना, अंध क्रिकेट क्षेत्रात मिळालेले हे जागतिक यश स्थानिक क्रीडा संघटनांनी आणि क्रिकेट विश्वाने अधोरेखित करणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे. राज्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे अंध खेळाडू अधिक जोमाने पुढे यावेत यासाठी योग्य प्रोत्साहन, मान्यता आणि पुनर्वसनाच्या संधी उपलब्ध झाल्यास अनेक तरुणांना नवी प्रेरणा मिळेल.

क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र ही संस्था मागील पंधरा वर्षांपासून अंध खेळाडूंसाठी प्रशिक्षण, निवड शिबिरे आणि विविध स्पर्धांचे आयोजन करत सातत्याने कार्यरत आहे. शासनाच्या सहकार्याची साथ लाभल्यास या खेळाडूंना अधिक व्यापक व्यासपीठ मिळून राज्याचा क्रीडा वारसा अधिक भक्कम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



## पहिल्या टी२० अंध महिला क्रिकेट विश्वचषक विजयाबद्दल मोदींद्वारे अभिनंदन

नवी दिल्ली-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भारतीय अंध महिला क्रिकेट संघाचे, अंध महिला ऊ २० विश्वचषक प्रथमच जिंकून इतिहास रचल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

संपूर्ण मालिकेत अपराजित रा-हून केलेल्या संघाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची पंतप्रधानांनी प्रशंसा केली आहे आणि कठोर परिश्रम, सांघिक कामगिरी आणि दृढनिश्चयाचे ते एक चमकदार उदाहरण असल्याचे म्हटले आहे. यातील प्रत्येक खेळाडू हा खरा चॅम्पियन आहे ज्याच्या समर्पणाने देशाला हा गौरव प्राप्त झाला आहे,असे पंतप्रधानांनी अधोरेखित केले आहे आपल्या एक्स पोस्टवर पंतप्रधानांनी लिहिले :''पहिला अंध महिला टी-२० विश्वचषक जिंकून इतिहास रचल्याबद्दल भारतीय अंध महिला क्रिकेट



संघाचे अभिनंदन! त्याहूनही कौतुकास्पद म्हणजे त्या मालिकेतील सर्व सामन्यांत अपराजित राहिल्या. ही खरोखरच एक ऐतिहासिक कामगिरी आहे, कठोर परिश्रम, सांघिक कार्य आणि दृढनिश्चयाचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे.यातील प्रत्येक खेळाडू एक विजेता आहे! संघाला त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी माझ्या शुभेच्छा. त्यांची ही वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी येणाऱ्या पिढ्यांना कायम प्रेरणा

## वॉशिंग्टन सुंदरला ८ व्या स्थानावर फलंदाजीला का पाठवले? रवी शास्त्री गंभीरवर भडकले

गुवाहाटी-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरी कसोटी गुवाहाटी येथे सुरु आहे. या कसोटीत दक्षिण आफ्रिका भक्कम स्थितीत असून भारतावर सामन्यात पराभवाचं संकट कायम आहे. रिषभ पंतच्या नेतृत्वातील टीम इंडिया बॅकफूटवर पाहायला मिळत आहे. दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात ४८९ धावा केल्या. तर, भारताचा पहिला डाव २०१ धावांवर आटोपला. यामुळं पहिल्या डावातच दक्षिण आफ्रिकेला २८८ धावांची आघाडी मिळाली. दक्षिण आफ्रिकेनं दुसऱ्या डावात बिनबाद २६ धावा केल्या असून त्यांच्याकडे आता ३१४ धावांची आघाडी आहे.गुवाहाटी कसोटीत पहिल्या डावात भारताचे फलंदाज अपयशी ठरले. अपवाद फक्त यशस्वी जयस्वाल आणि वॉशिंग्टन सुंदर हे दोघे होते. मार्को जेनसन यानं ६ विकेट घेतल्यानं भारताचा डाव २०१ धावांवर आटोपला. भारताचे गोलंदाज, फलंदाज अपयशी ठरत आ-हेत त्यामुळं संघनिवडीवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे.



भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी गौतम गंभीरच्या काही निर्णयांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. शास्त्री म्हणाले वॉशिंग्टन सुंदर यानं कोलकाता कसोटीत फक्त एक ओव्हर गोलंदाजी केली होती तेव्हा त्याला तिसऱ्या स्थानावर फलंदाजीसाठी पाठवण्यात आलं होतं. भारतानं त्या कसोटीत चार फिरकी गोलंदाज खेळवले होते तिथं त्याला गोलंदाजी दिली नव्हती असंच म्हणावे लागेल.

रवि शास्त्री म्हणाले अक्षर पटेल किंवा वॉशिंग्टन सुंदर एकाच्या जागेवर अतिरिक्त फलंदाजाला संधी दिली पाहिजे. कोलकाता कसोटीत एका स्पिनरने एकच ओव्हर गोलंदाजी केली असेल तर तिथं एका अतिरिक्त फलंदाजाला संधी द्यायला हवी होती. कोलकाता कसोटीत त्याला तिसऱ्या स्थानावर पाठवले होते तर त्याच्यावर विश्वास ठेवायला पाहिजे होता. शुभमन गिल दुखापतग्रस्त असल्याने साई सुदर्शन संघात आला. त्यामुळं सुंदर चौथ्या स्थ-ानावर फलंदाजी करु शकला असता. सुंदरनं कोलकाता कसोटीत भारताकडून दोन्ही डावात मिळून सर्वाधिक ६० धावा केल्या होत्या. त्यानंतरही त्याला आठव्या स्थानावर पाठवले गेले. वॉशिंग्टन सुंदर चौथ्या स्थ-ानावर सहजपणे खेळू शकला असता, तो आठव्या स्थानाचा फलंदाज नाही, असे शास्त्री म्हणाले. वॉशिंग्टन सुंदरने गुवाहाटी कसोटीच्या पहिल्या डावात ४८ धावा केल्या आहेत.दरम्यान, भारताला न्यूझीलंड विरुद्धची कसोटी मालिका मायदेशात गमवावी लागली होती. त्यानंतर शुभमन गिलच्या नेतृत्वात भारताने वेस्ट इंडिजला २-० असे पराभूत केले होते. मात्र,आफ्रिकेविरुद्ध मालिका गम ावण्याचे संकट निर्माण झाले आहे.

# कोलकाता पाठोपाठ गुवाहाटी कसोटीवरही दक्षिण आफ्रिकेचेच वर्चस्व

गुवाहाटी : भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकाने पहिल्या डावात भारताला मोठ्या फरकाने पराभूत केले. नाणेफेक जिंकून फलंदाजीला उतरलेल्या दक्षिण आफ्रिकाने ४८९ धावा केल्या. त्यानंतर भारताचा पाठलाग करताना संघ फक्त २०१ धावांवर सर्वबाद झाला. यामुळे दक्षिण आफ्रिकेला पहिल्या डावात २८८ धावांची आघाडी मिळाली आणि सामन्यावर त्यांचा स्पष्ट वर्चस्व निर्माण झाला. भारताकडून यशस्वी जयस्वालने सर्वाधिक ५८ धावा केल्या, तर वॉशिंग्टन सुंदरने ४८ धावा केली. अन्य फलंदाज मोठ्या प्रमाणावर टिकाव धरू शकले नाहीत. केएल राहुल २२ धावा करून माघारी गेला, त्याला केशव महाराजने बाद केले. सलामीवीर जयस्वालने ९७ चेंडूत ५८ धावा करून अर्धशतक पूर्ण केले, परंतु सायमन हार्मरच्या गोलंदाजीने त्याला माघारी पाठवले. साई सुदर्शन १५, ध्रुव जुरेल ०, ऋषभ पंत ७, रवींद्र जडेजा ६, नितीश कुमार रेड्डी १०, कुलदीप यादव १९, जसप्रीत बुमराह ५ धावा करून बाद झाले, तर मोहम्मद सिराज २ धावा करून नाबाद राहिला.

दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जानसेनने ६ विकेट्स घेतले, तर सायमन हार्मरने ३ आणि केशव महाराजने १ विकेट घेतली. त्यांच्या जोरदार गोलंदाजीमुळे भारताच्या फलंदाजांना डावात टिकाव धरता आला नाही.

दुसऱ्या दिवशी भारताने १ बाद ९५ धावांवरून ७ बाद १२२ अशी खेळी केली आणि विजय मिळवण्याच्या आशा संपल्या. जॅनसेनच्या आक्रमक शॉर्ट-पिच गोलंदाजीमुळे भारताचा डाव पूर्णपणे तुटला. बॉल-बाय-बॉल रेकॉर्डनुसार, कसोटीमध्ये एका डावात जॅनसेनसारखी गोलंदाजी अजून कोणीही वापरली नाही, ज्यामध्ये त्याने बाउन्सरचा प्रभावी वापर करून भारताचे फलंदाज माघारी पाठवले.

दक्षिण आफ्रिकेला ४८९ धावांचा पाठलाग करण्यासाठी फक्त २०१ धावा मिळाल्यामुळे त्यांना पहिल्या डावात २८८ धावांची आघाडी मिळाली. भारताच्या मालिकेत विजयी परिणामाची आशा संपली असून, दक्षिण आफ्रिकेला १-० अशी आघाडी मिळाली आहे.

दुसऱ्या दिवशी भारतीय फलंदाजांना जॅनसेन आणि हार्मरच्या गोलंदाजीमुळे कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागले. वॉशिंग्टन सुंदर आणि कुलदीप यादवने काही काळ बचावात्मक फलंदाजी करून आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला, परंतु शेवटी दक्षिण आफ्रिकेने भारतावर पूर्ण वर्चस्व गाजवले. भारतासाठी आता तिसऱ्या कसोटी सामन्यात पराभव टाळण्याचे मोठे आवाहन आहे.



# ऊर्जा क्षेत्रातील उत्कृष्टतेचा महावितरण व सीएमडी श्री. लोकेश चंद्र यांना राष्ट्रीय पुरस्कार





**मुंबई/प्रतिनिधी :** स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी महावितरणने अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत आतापर्यंत केलेल्या एकूण वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केला आहे. यासह विद्युत व ऊर्जा क्षेत्रात केलेल्या विविध कामगिरीची दखल घेऊन १२ व्या नॅशनल अवार्डस् फॉर एक्सलन्स २०२५ इन पॉवर ॲण्ड एनर्जीच्या कार्यक्रमात महावितरण कंपनीला ‘पॉवर डिस्ट्रीब्यूशन युटिलीटी ऑफ द इयर’ आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांना ‘एनर्जी इनोव्हेटर ऑफ द इयर’ या राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

मुंबई येथे गुरुवारी (दि. २०) आयोजित कार्यक्रमात हे दोन्ही पुरस्कार मानव संसाधन विकासाचे विशेषज्ञ डॉ. आर. एल. भाटिया यांच्याकडून महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत, कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत गोंधळेकर, डॉ. संतोष पाटणी, सचिन घरत, शंतनू एदलाबादकर यांनी स्वीकारले.


केंद्र शासनाकडून सन २०३० पर्यंत देशात एकूण वीज निर्मिती क्षमतेमध्ये ५० टक्के अपारंपरिक ऊर्जेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यासाठी ५०० गिगावॅट () पर्यंत अक्षय ऊर्जा क्षमता वाढविण्याचे धोरण आहे. त्यास अनुसरून महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ ट्क्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे.

ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी आतापर्यंत २७७३ मेगावॅट क्षमतेचे ५१२ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. त्यातून ६ लाख २५ हजारांवर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे. तर देशात सर्वाधिक ६० टक्के म्हणजे ६ लाख ४७ हजारांवर सौर कृषिपंप महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात आले आहे. यासह गेल्या दीड वर्षांमध्ये राज्यातील २ लाख ५० हजारांवर घरगुती ग्राहकांकडे छतावरील सौर ऊर्जा निर्मितीसाठी १ हजारांवर मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले असून या ग्राहकांचे मासिक वीजबिल देखील शून्यवत झाले आहे.

महावितरणकडून विजेच्या मागणीचा अंदाज व त्याचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे विश्लेषण करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्याद्वारे मागणीचा अचूक अंदाज व सर्वात कमी खर्चात वीज खरेदीचे व्यवस्थापन सुरू आहे. सूक्ष्म वीज खरेदीच्या नियोजनाद्वारे विजेचे कुठेही भारनियमन न करता विक्रमी २६ हजार ४९५ मेगावॅट विजेचा सुरळीत पुरवठा करण्यात महावितरणने यश मिळवले आहे, हे विशेष.

वीज वितरण यंत्रणेच्या प्रभावी संचालनासाठी माहिती तंत्रज्ञानावर मोठा भर देण्यात आला असून पायाभूत यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरण वेगात सुरू आहे. ग्राहकांना घरबसल्या सेवा देण्याची प्रक्रिया आणखी तत्पर करण्यात आली असून वीजभारात वाढ किंवा वीजबिलाच्या नावात बदल करण्यासाठी ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरीची प्रणाली सुरू आहे. यासह विविध उल्लेखनीय कामांची दखल घेऊन जागतिक मानव संसाधन विकास परिषदेच्या निवड समितीने महावितरण तसेच अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांची पुरस्कारासाठी निवड जाहीर केली.

## शुभम भांबरे यांचा काँग्रेस मध्ये प्रवेश रेणापूर काँग्रेसकडून त्यांचा झाला सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** कोंग्रेसचे युवक पदाधिकारी असलेले शुभम भांबरे यांनी काही दिवसापूर्वी नुकताच भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला होता मात्र पुन्हा त्यांनी सोमवारी लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली रेणापूर येथे जिल्हापरिषदचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख काँग्रेस पक्षाचे निरीक्षक सचिन पाटील यांच्या उपस्थितीत रेणापूर येथे काँग्रेसमध्ये प्रवेश केला त्यांचा यावेळी शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

यावेळी रेणापूर कोंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे शहर अध्यक्ष पदंम पाटील, रेणा साखर कारखान्याचे संचालक गोविंद पाटील, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, राजू माने, रेणा साखर कारखान्याचे संचालक, पंडित माने,संचालक धनराज देशमुख बाजार समितीचे उपसभापती शेषराव हाके संचालक प्रकाश जाधव, मतीन सय्यद, शहर सचिव रोहित गिरी पंडित भांबरे, प्रवीण माने धनंजय देशमुख अतुल कातले, सेवा दलाचे तालुकाध्यक्ष हणमंत पवार बाळासाहेब करमुडे आदि मान्यवर काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मतदार मोठया संख्येने उपस्थित होते

मीं काँग्रेसचा कार्यकर्ता

यावेळी बोलताना शुभम भांबरे यांनी मी धीरज देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली कार्य करत होतो पण माझ्या काही मित्रांनी भाजप मध्ये प्रवेश करून घेतला होता मात्र मी काँग्रेसचा पाईक असल्याने पुन्हा मी घरवापसी केले असून काँग्रेसच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असून नगर पंचायत निवडणुकित काँग्रेसला निवडून आणण्यासाठी मी माझे कार्यकर्ते जीवाचे रान करून निवडून आणू असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला

## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांचा बाभळगाव निवासस्थानी नागरिकांशी संवाद; समस्यांचे केले निवारण, विविध संस्थाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतली भेट



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी रविवार दि. २३ नोव्हेंबर २५ रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर व जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांच्या भेटी घेतल्या. स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पाश्वभुमीवर विविध संस्था आणि संघटनाच्या पदाधिकारी यांनी आमदार देशमुख यांची भेट घेतली.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विविध संस्थांचे पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या. तसेच, त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तात्काळ सूचना केल्या.यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव कल्याण पाटील, उदगीर नगरपरिषद निवडणूक प्रक्रियेतील काँग्रेसचे निरीक्षक रवींद्र काळे, तसेच माधव कांबळे पद्माकर उगिले ज्ञानोबा गोडभरले विजयकुमार चवळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, माजी उपमहापौर कैलास कांबळे, चंदन पाटील नागराळकर, उदगीर शहर युवक अध्यक्ष अजय शेटकर, उदगीर तालुका युवक अध्यक्ष कृष्णा घोगरे, कपिल समगे, ओम काळे, बंटी कद्रे, मनोज हावा, बसवराज शेटकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरीक उपस्थित होते.

## कोल्हापूर विमानतळा वर तुफान राडा...

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर विमानतळाबाहेर मोठा राडा झाला आहे. येथील स्थानिकांनी अचानक विमानतळ परिसरात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. कोल्हापूर विमानतळाजवळ असलेल्या तामगाव ग्रामस्थांनी आपला संताप व्यक्त करण्यासाठी जमाव करुन गोळा करुन विम ानतळाच्या दिशेने चालून गेले. या स्थानिकांना पोलिसांनी रोखलं असून विमानतळाबाहेर जोरदार घोषणाबाजी होत आहे. कोल्हापूरच्या विमानतळाच्या पाठीमागील बाजूस तामगावला जाणारा रस्ता विमानतळ प्राधिकरणाने अडवल्यामुळे तामगाव ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

## लातूर जिल्ह्यातील सराफ सुवर्णकार व्यापाऱ्याचा संताप, अत्त्याचार प्रकरणी एकदिवसीय मार्केट बंद





**लातूर/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील मौजे डोंगराळे या गावात सुवर्णकार समाजातील केवळ तीन वर्षांच्या चिमुरड वर झालेल्या अमानुष अत्याचारानंतर निर्घृण हत्या झाल्याची घटना घडल्याने संपूर्ण सुवर्णकार समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या भयानक घटनेने समाजासह सर्वसामान्य नागरिकही हादरले आहेत.या निष्पाप बालिकेला न्याय मिळावा आणि दोषींना कठोरातली कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी लातूर जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशनतर्फे सोमवारी संपूर्ण दिवस लातूर शहरातील तसेच जिल्ह्याभरातील सराफ सुवर्णकार मार्केट तसेच संबंधित व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली.

या बंदमध्ये सराफ सुवर्णकार व्यापाऱ्यांसह अटणीवाले, बंगाली कारागीर, गठायीवाले आणि इतर कारागीर मोठ्या संख्येने सहभागी झाले. दिवसभर मार्केट बंद पाळून व्यापाऱ्यांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला.या प्रसंगी असोसिएशनच्या वतीने मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, निष्पाप बालिकेला न्याय मिळेपर्यंत समाज शांत बसणार नाही. या गुन्ह्याची चौकशी जलदगतीने करून खटला फास्टट्रॅक न्यायालयात वर्ग करण्यात यावा आणि दोषींना फाशीची शिक्षा ठोठावावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रशासनाने अशा प्रकारच्या घृणास्पद आणि मानवतेला काळिमे फासणाऱ्या घटनांना रोकण्यासाठी कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी समाजाच्या वतीने मांडण्यात आली आहे.

या निवेदन प्रसंगी लातूर जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशनचे राजाभाऊ बोकन, रामभाऊ चलवाड, विकास चामे, अमित भोसले, अजय भूमकर, बजरंग वर्मा, गजेंद्र बोकन, शुभम पाटील, शैलेश टेहरे, ओमकार तरटे, शिवनारायण माकणीकर, दत्ता पंडित, रवी पोद्दार, रामेश्वर पाटील, नामदेव पोतदार, जमादार आदी मान्यवर उपस्थित होते.व्यापाऱ्यांनी या निमित्ताने स्पष्ट संदेश दिला की, अशा पाशवी कृत्यांनी मानवी समाजाचे रूप कलंकित होते आणि त्यामुळे दोषींविरुद्ध आदर्श शिक्षा देणे अत्यंत आवश्यक आहे.

निष्पाप यज्ञाच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजाने एकजुटीने आवाज उठवून मानवतेचा दीप प्रज्वलित ठेवण्याचा प्रयत्न केला.

## मुंबईत तयार करणार ‘पाताल लोक’, लोकलबाबतही मोठा निर्णय; देवेंद्र फडणवीसांनी सांगितला मेगाप्लान

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत विविध प्रकल्पांची कामे वेगाने सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या युथ कनेक्ट या मोहिम अंतर्गत फडणवीस हे मुंबईत बोलत होते. वरळीतील एनएससीआय डोम येथे तरुणांशी बोलताना त्यांनी मुंबईतील विकास प्रकल्पांबाबत म हत्त्वाची माहिती दिली आहे. आम्ही मुंबईत पाताल लोक तयार करत आहोत, असं फडणवीसांनी म्हटलं आहे.

’मुंबईत जो विकास झाला तो आतापर्यंत फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अजून बाकी आहे. मला यावरुन ट्रोल केलं गेलं, विरोधकांनी मजा घेतली. कोस्टल रोड आम्ही बनवतोय. ठाणे-बोरिवली टनेल आहे. बोरिवली ते गोरेगाव रस्ता तयार करतोय. शिवडी ते कोस्टल रोड ब्रिज तयार करतोय. मुलुंड ते गोरेगाव टनेल लिंक तयार करतोय. त्यामुळे वाहतूक कोंडी यातून सोडवण्याचा प्रयत्न होईल,’ असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## उदगीर नगरपरिषद निवडणुक काँग्रेस पक्षाला बळकटी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधीकारी व कार्यकर्त्याचा काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



**लातूर/प्रतिनिधी :** राज्यासह लातूर जिल्हयात निवडणूक धामधूम चालू आहे. या संदर्भाने उदगीर नगरपरिषद निवडणुकीची धामधूम सुरू असतानाच काँग्रेस पक्षाला बळकटी देणारी मोठी घडामोड घडली असून बाभळगाव निवासस्थानी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष चंदन पाटील नागराळकर, उदगीर शहर युवक अध्यक्ष अजय शेटकर, उदगीर तालुका युवक अध्यक्ष कृष्णा घोगरे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.

बाभळगाव निवासस्थानी रविवार दि. २३ नोव्हेंबर २५ रोजी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष चंदन पाटील नागराळकर, उदगीर शहर युवक अध्यक्ष अजय शेटकर, उदगीर तालुका युवक अध्यक्ष कृष्णा घोगरे यांच्यासह कपिल समगे, ओम काळे, बंटी कद्रे, मनोज हावा, बसवराज शेटकर या पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव कल्याण पाटील, उदगीर काँग्रेसचे निरीक्षक रवींद्र काळे, माधव कांबळे, पद्माकर उगिले, ज्ञानोबा गोडभरले, विजयकुमार चवळे आदी उपस्थित होते. या सर्वांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या तरुण कार्यकर्त्यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे उदगीर शहर आणि तालुक्यातील काँग्रेस संघटना अधिक मजबूत झाली असून, होऊ घातलेली नगरपरिषद निवडणूक आणि आगामी काळात होणाऱ्या पंचायत समिती, जिल्हा परिषद व इतर निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळेल असा विश्वास यावेळी आमदार देशमुख यांनी व्यक्त केला.

उदगीर तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संतोष बिराजदार यांचेही याप्रसंगी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजमध्ये ‘‘नशामुक्त भारत’’ अभियानांतर्गत शपथ कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** ‘‘नशामुक्त भारत’’ अभियानांतर्गत चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे सर्व शिक्षक व विद्यार्थांनी नशामुक्तीची शपथ घेऊन ‘‘नशामुक्त भारत’’ अभियानात सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य व संशोधन विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश भुसनुरे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात तरुणाई ही देशाची सर्वात मोठी संपत्ती असल्याचे सांगून नशेच्या व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम विस्तृतपणे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी नशेमुक्त समाज घडविण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहनही त्यांनी केले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नशेपासून होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम, त्यापासून बचावाचे उपाय, तसेच युवकांमध्ये वाढत चाललेल्या व्यसनाच्या प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्याची गरज याबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली.

सदरील कार्यक्रमास प्र. प्राचार्य डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. भीमाशंकर हुच्चे, प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. प्रशांत बनसोडे, शिवहार विभुते, गणेश स्वामी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# 'एफआरपी'साठी ढोकीमध्ये रास्ता रोको

## उसाला ३५०० रुपये पहिली उचल देण्याची मागणी



धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव जिल्ह्यातील साखर कारखानदार तसेच गुळ पावडर कारखानदार यांनी चालू वर्षातील एफआरपी जाहीर न करताच ऊस गाळप चालू केले आहे. एफआरपी जाहीर करण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आता आक्रमक झाली आहे. शुक्रवारी ढोकी येथे रास्ता रोको आंदोलन करून उसाला ३५०० रुपये पहिली उचल देण्यात यावी, अशी मागणी लावून धरली होती. जिल्ह्यातील ऊस कारखाने व गूळपावडर कारखान्यांचा गाळप हंगाप सुरू झाला आहे. शेतकऱ्यांचा ऊस तोडून नेला जात आहे. मात्र, अजूनही एफआरपी जाहीर झाली नसल्याचा आरोप करत स्वाभिमानी संघटनेच्या वतीने शुक्रवारी ढोकी येथे रास्ता रोको आंदोलन केले. उसाचा एफआरपी दर जाहीर करून पहिली उचल ३,५०० रुपये देण्यात यावी, अशी मागणीही या वेळी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली. प्रशासनाने दखल घेतली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असा इशाराही या वेळी देण्यात आला. आंदोलनात जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे, शहाजी सोमवंशी, धनाजी पेंदे, विष्णूदास डाळे, सचिन ठेले आदी उपस्थित होते. नियम धाब्यावर बसवून गाळप, प्रशासन कारखान्याच्या पाठीशी साखर कारखानदार आणि गूळ पावडर कारखानदार यांनी सर्व नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीर गाळप करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे. त्यास प्रशासन सुद्धा जबाबदार आहे. खूली लूट सुरू असताना साखर आयुक्तालय व प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेऊन या साखर सम्राटांना पाठीशी घालत असल्याचा आरोपही केला.

# १,५७,५०० किंमतीच्या ॲल्युमिनियम तारेची अज्ञाताने केली चोरी

वाशी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत दि.१७.११.२०२५ रोजी शेत गट नं २६/ब दहिफळ शिवार मधील सिरेन्टीका कंपनीचे लोकेशन ४८ ते ५० येथे पॅंथर लाईन ॲल्युमिनीयम तार एकुण १०५० मिटर लांबीची १,५७,५०० किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अशोक सुरेश जगदाळे, वय ३२ वर्षे, रा. वंजारवाडी ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.२२.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# राज्यस्तरीय पहिल्या अभंगवाणी साहित्य संमेलनात भक्तीचा जागर; श्री क्षेत्र अचलबेट देवस्थानात रंगला सोहळा



उमरगा (प्रतिनिधी)-भागवत सांप्रदायानी जाती-पाती धर्म उतरंडीच्या पलीकडे जात माणूसपण जपण्याचा विचार महाराष्ट्रालाच नाहीतर पूर्ण जगाला दिला, असे गौरवोद्गार काव्यप्रेमी महाराष्ट्र आयोजित अभंगवाणी राज्यस्तरीय साहित्य संमेलनात उद्घाटन प्रसंगी विश्वनाथ तोडकर यांनी मांडले. प्राचार्य वेंकट अणिगुंटे यांनी संप्रदाय हा माणसाला मुक्ती देण्याचा शांततेचा आणि सौंदर्याचा विचार देतो, असे विचार मांडले. तालुक्यातील तुरोरी-कराळी श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान येथे काव्यप्रेमी महाराष्ट्र आयोजित राज्यस्तरावरील पहिले अभंगवाणी साहित्य संमेलन रविवारी (दि. २३) उत्साही वातावरणात संपन्न झाले. संमेलनाच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र लोकविकास मंच अध्यक्ष विश्वनाथ तोडकर हे होते. अचलबेट देवस्थान भीम महाराज जाधव, हरी गुरूजी लवटे, भूमिपुत्र वाघ, माजी प्राचार्य व्यंकट अनिगुंठे, अनाथाची विद्याताई वाघ, कमलाकर भोसले, लक्ष्मण पवार, विकास राठोड, प्राचार्य विकास गायकवाड, सुधाकरराव झिंगाडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी देवस्थान येथे सद्गुरु काशिनाथ महाराज, सद्गुरु उज्ज्वलानंद महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून सुरुवात झाली. पंढरपूरचे ६६ विठ्ठलभक्त कवींकडून सादरीकरण राज्यातील कानाकोपऱ्यातून नामवंत ६६ पंढरपूरचे विठ्ठलभक्त कवी उपस्थित होते. यात सुमनताई पवार, ॲड. शुभदा पोतदार, ॲड. फरहीन पटेल, भाग्यश्री असुरे, विश्वनाथ महाजन, सरोजा गायकवाड, प्रा. नागसेन कांबळे, गोविंद श्रीमंगल, मधुकर हुजरे, अशोक चव्हाण वैशाली गायकवाड, सुभाष चव्हाण, सुधाकर झिंगाडे, कमलाकर भोसले, श्रुती चौधरी, स्नेहा जाधव, कान्हा खानसोळे, के. पी. बिराजदार, दत्ता काजळे, वैष्णवी कटारे, विकास राठोड, काकासाहेब कांबळे, राधा मन्नाडे, सुनीता मोरे, दत्तात्रय दुबे, भूमिपुत्र वाघ, राम माटे, अरविंद मलवाडे, दत्ता वालेकर, सुनंदा भगत, रमेश हनुमंते, दयानंद पाटील, नागनाथ बंड, ज्ञानेश्वर माशाळकर, शामराव काळे, विद्याताई मारकर, सौरभ जवळपुरे, प्रियंका गायकवाड, नरेंद्र गुंडेली, कल्याण राऊत, सुषमा कटारे, राजपूत काशीबाई, बाळासाहेब मगर, रामचंद्र गुरव यांनी पांडुरंगाचे अभंग रचना सादर केल्या.

# एनव्हीपी शुगर प्रा.लि.च्या वतीने १ लाख जागरी पावडर पोत्यांचे पूजन

तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा.लि. च्या वतीने सन २०२५-२०२६ च्या द्वितीय गळीत हंगामात उत्पादित झालेल्या १ लाख जागरी पावडर पोत्यांचे पूजन तेरणा शेतकरी सहकारी कारखान्याच्या माजी चेअरमन श्रीमती आनंदीदेवी पवन राजेनिंबाळकर व कारखान्याचे मार्गदर्शक मा.श्री. आप्पासाहेब पाटील साहेब यांच्या हस्ते दि.२४ नोव्हेंबर रोजी करण्यात आले. तसेच २४ नोव्हेंबर २०२२ रोजी सुरू झालेल्या या कारखान्याच्या तिसर्या वर्धापन दिनानिमित्त जागजी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटपही करण्यात आले.

याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन नानासाहेब पाटील, विकास पाटील, सुनिल लोमटे, प्रविण पाटील, इ.इंजिनिअर प्रविण यादव, सुरक्षा अधिकारी मेजर चंद्रकांत पवार, परचेस अधिकारी रवि जोगदंड, सेल्स ऑफिसर सागर शिंदे, दत्तात्रय टेकाळे, गोडाऊन किपर सुरेंद्र गिरी, राजाभाऊ केवळराम, बालाजी गुळवे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

एनव्हीपी शुगर प्रा.लि. या जागरी पावडर निर्मिती कारखान्याने सन २०२५-२०२६ च्या द्वितीय गळीत हंगामात २५ हजार मेट्रिक उसाचे गाळप करून १ लाख जागरी पावडर पोत्यांचे उत्पादन केलेले अतिवृष्टीसारख्या कठीण परिस्थितीत सर्वांच्या सहकार्याने हे शक्य झाले असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब व्यंकटराव पाटील यांनी दिली.

एनव्हीपी शुगरला यावर्षी कारखाना कार्यक्षेत्रात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे गळीत हंगामाच्या सुरूवातीपासून अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. ऑक्टोंबर महिन्यात संत -महंतांसह सहकार क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला होता. परंतु अतिवृष्टीमुळे ऊसफडात वाहने घेवून जाणे आणि तोडणी करताना अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण झाली. या सर्व अडचणींवर चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी कुशल नियोजन करून गाळप हंगामाला सुरूवात केली.

गळीत हंगामात कारखान्याच्या व्यवस्थापनातील प्रत्येकाने अहोरात्र परिश्रम करून २५ हजार मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले. या हंगामात १ लाख जागरी पावडर पोत्यांचे उत्पादन केले आहे. गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, कर्मचारी, ऊस उत्पादक, सभासद, ऊस तोडणी व वाहतूक ठेकेदार, तोडणी यंत्र ठेकेदार, तोडणी मजूर आणि सर्व सर्व सहकार्यांचे आभार व्यक्त केले आहेत.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# २ डिसेंबर रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीसाठी होणार मतदान

## ८ नगराध्यक्ष व १८९ सदस्यांची निवड करणार २ लक्ष ४३ हजार मतदार

- * ९३ प्रभागासाठी होणार २८७ मतदान केंद्रावर मतदान
- * १८९ सदस्यांची होणार निवड
- * २८ तृतीयपंथी बजावणार मतदानाचा हक्क
- * मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३०
- * ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होणार

धाराशिव दि.२३ नोव्हेंबर (जिमाका): ९ वर्षानंतर जिल्ह्यातील आठ नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे.२ लक्ष ४३ हजार ६६७ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावतील.यामध्ये २८ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.८ नगराध्यक्ष आणि १८९ सदस्यांची निवड २८७ मतदान केंद्रातून करण्यात येणार आहे.मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजतापर्यंत आहे.निकाल ३ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे.

जिल्ह्यातील अ वर्ग नगरपरिषद असलेल्या धाराशिवसाठी २० प्रभागातून १ नगराध्यक्ष व ४१ सदस्यांची निवड करण्यात येणार आहे.यासाठी १०८ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.तुळजापूर नगरपरिषदेत ११ प्रभाग असून १ नगराध्यक्ष व २३ सदस्यांची निवड होणार आहे.३५ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

नळदुर्गमध्ये १० प्रभागातून १ नगराध्यक्ष व २० सदस्य निवडले जाणारे आहेत.त्यासाठी २० केंद्रावर मतदान होणार आहे.उमरगा येथे १२ प्रभाग असून १ नगराध्यक्ष व २५ सदस्यांची निवड ३७ मतदान केंद्रातून होणार आहे.मुरूममध्ये १० प्रभागातून १ नगराध्यक्ष व २० सदस्यांची निवड २० मतदान केंद्रातून होणार आहे.

कळंब नगरपरिषदेमध्ये १० प्रभागातून १ नगराध्यक्ष व २० सदस्यांची निवड २४ मतदान केंद्रावर होणार आहे.भूम नगरपरिषदेमध्ये एकूण १० प्रभाग असून १ नगराध्यक्ष व २० सदस्यांची निवड २१ मतदान केंद्रातून होणार आहे.परंडा नगरपरिषदेत एकूण १० प्रभाग असून १ नगराध्यक्ष आणि २० सदस्यांची निवड २२ मतदान केंद्रातून होणार आहे.

जिल्ह्यातील एकूण ८ नगरपरिषदेमध्ये एकूण ९३ प्रभाग आहे.या प्रभागातून ८ नगराध्यक्ष आणि १८९ सदस्यांची निवड २८७ मतदान केंद्रातून होणार आहे.

धाराशिव नगरपरिषदेसाठी ४८ हजार ४०७ पुरुष,४५ हजार ५८३ स्त्री आणि १६ तृतीयपंथी असे एकूण ९४ हजार ६ मतदार आहे.तुळजापूर नगर परिषदेसाठी १४ हजार ५३८ पुरुष,१५ हजार १७ स्त्री आणि सहा तृतीयपंथी अशी एकूण २९ हजार ५६१ मतदार आहे.नळदुर्ग नगरपरिषदेसाठी ८७३६ पुरुष आणि ८३८४ स्त्री असे एकूण १७ हजार १२० मतदार आहेत.

उमरगा नगरपरिषदेसाठी १६ हजार २३१ पुरुष,१५ हजार ५५५ स्त्री आणि पाच तृतीयपंथी असे एकूण ३१ हजार ७९१ मतदार आहे.मुरूम नगरपरिषदेसाठी ७७१४ पुरुष,७२०५ स्त्री आणि एक तृतीयपंथी असे एकूण १४ हजार ९२० मतदार आहे.

कळंब नगरपरिषदेसाठी १० हजार ७१३ पुरुष आणि १० हजार २४५ स्त्री मतदार असे एकूण २० हजार ९५८ मतदार.भूम नगरपरिषदेसाठी ९२२८ पुरुष आणि ८८४९ स्त्री असे एकूण १८ हजार ७७ आणि परंडा नगरपरिषदेसाठी ८६२२ पुरुष आणि ८६१२ स्त्री असे एकूण १७ हजार २३४ मतदार तर या आठ नगर परिषदेसाठी एकूण १ लक्ष २४ हजार १८९ पुरुष,१ लक्ष १९ हजार ४५० स्त्री आणि २८ तृतीयपंथी असे एकूण २ लक्ष ४३ हजार ६६७ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार आहे.

धाराशिव नगरपरिषदेची मतमोजणी ही शासकीय तंत्रनिकेतन कॉलेज,धाराशिव. तुळजापूरची मतमोजणी श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय,तुळजापूर. नळदुर्गची मतमोजणी जिल्हा परिषद मुलांची शाळा (सभागृह).उमरग्याची मतमोजणी अंतूबळी पतंगे सभाग्रह. मुरूमची मतमोजणी नगरपरिषद कार्यालय सभागृह,कळंबची मतमोजणी श्री संत गोरोबाकाका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळंब,भूमची मतमोजणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आणि परंडा नगरपरिषदेची मतमोजणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह येथे होणार आहे.

नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. धाराशिव : नागरिकाचा मागास प्रवर्ग (महिला),तुळजापूर : सर्वसाधारण,नळदुर्ग : सर्वसाधारण,उमरगा सर्वसाधारण,मुरूम : सर्वसाधारण,कळंब : सर्वसाधारण (महिला),भूम सर्वसाधारण (महिला) व परंडा : नागरिकाचा मागास प्रवर्ग असे आहे.

जिल्ह्यातील आठ नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या नगराध्यक्ष पदाच्या छाननी अंती ७६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.यामध्ये धाराशिव :१३,तुळजापूर :१४,नळदुर्ग :७,उमरगा :१२, मुरूम : ७, कळंब : ९,भूम :८ आणि परंडा ६ उमेदवारांचा समावेश आहे.

नगराध्यक्षपदाची उमेदवारी मागे घेण्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे १९ नोव्हेंबर रोजी तुळजापूर येथून एका उमेदवाराने अर्ज मागे घेतला. २० नोव्हेंबर रोजी दुसऱ्या दिवशी उमरगा येथून एक आणि परंडा येथून तीन अशा एकूण चार उमेदवारांनी नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीतून माघार घेतली . २१ नोव्हेंबर रोजी म्हणजे उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी एकूण ३३ उमेदवारांनी नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीतून माघार घेतली. त्यामध्ये धाराशिव ७, तुळजापूर ६, नळदुर्ग १, उमरगा ७, मुरूम ३, कळंब ३, भूम ५ आणि परांडा एक उमेदवारांचा समावेश आहे.

नगराध्यक्ष पदाच्या निवडणूक रिंगणात आता ३८ उमेदवार असून यामध्ये धाराशिव ६,तुळजापूर ७,नळदुर्ग ६,उमरगा ४,मुरूम ४,कळंब ६,भूम ३ आणि परांडा २ उमेदवारांचा समावेश आहे.

नगरपरिषदेच्या सदस्य पदासाठी छाननी अंती ९३४ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. यामध्ये धाराशिव २५७,तुळजापूर ११९, नळदुर्ग १०४,उमरगा १२७,मुरूम ७०, कळंब ९४,भूम ७८ आणि परंडा ८५ उमेदवारांचा समावेश आहे.

१९ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या पहिल्या दिवशी तुळजापूर ७ आणि कळंब १ अशा ८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. दुसऱ्या दिवशी २० नोव्हेंबर रोजी ३१ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.यामध्ये धाराशिव १,तुळजापूर २,नळदुर्ग ४, मुरूम ३,कळंब ६ आणि परंडा १५ उमेदवारांचा समावेश आहे.अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी २५२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.यामध्ये धाराशिव ५५,तुळजापूर ४८, नळदुर्ग १७,उमरगा ३९,मुरूम १०,कळंब २०,भूम ३६ आणि परंडा २७ उमेदवारांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील आठही नगर परिषदेच्या सदस्य पदाच्या निवडणुकीत ६४३ उमेदवार आपले भाग्य आजमावित आहे.यामध्ये धाराशिव २०१, तुळजापूर ६२, नळदुर्ग ८३, उमरगा ८८, मुरूम ५७, कळंब ६७, भूम ४२ आणि परंडा ४३ उमेदवारांचा समावेश आहे.

नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची अंतिम तारीख २५ नोव्हेंबर २०२५ आहे. नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याची अंतिम तारीख २१ नोव्हेंबरपर्यंतच होती.अपील असल्यास २१ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर असा कालावधी निवडणूक आयोगाने निश्चित केला आहे.अपीलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल,त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी मात्र २५ नोव्हेंबरपर्यंत आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८९२
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649